# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १५०व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **२३ फेब्रुवारी, २०२१ (मंगळवार)** |
| **वेळ** | : | **दुपारी ०१.३० वाजता** |
| **स्थळ** | : | **समिती कक्ष, ९वा मजला,<br>मुं.म.प्र.वि.प्रा. नविन इमारत,<br>वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई – ४०० ०५१.<br>दूरचित्रसंवाद (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. एकनाथ शिंदे<br>माननीय मंत्री, नगर विकास | - | अध्यक्ष |
| डॉ. जितेंद्र आव्हाड<br>माननीय मंत्री, गृहनिर्माण | - | सदस्य |
| श्रीमती किशोरी पेडणेकर<br>माननीय महापौर,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्या |
| श्री. रवी राजा<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. मनोज कोटक<br>खासदार व नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. संजय कुमार<br>मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री. भूषण गगराणी<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. आर.ए.राजीव<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य-सचिव |

**<u>निमंत्रित :</u>**

श्री. नरेश म्हस्के
महापौर,
ठाणे महानगरपालिका

कुमारी योगिता पारधी
अध्यक्षा,
रायगड जिल्हा परिषद

श्रीमती भारती कामडी
अध्यक्षा,
पालघर जिल्हा परिषद

श्री. आर.एल.मोपलवार
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

बैठकीच्या सुरुवातीस माननीय मंत्री, नगर विकास तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांचे महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या वतीने स्वागत केले.

तसेच महानगर आयुक्त यांनी श्री. नरेश म्हस्के, महापौर, ठाणे महानगरपालिका, श्रीमती प्रतिभा विलास पाटील, महापौर, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका व श्रीमती प्रेरणा सावंत, नगराध्यक्षा, माथेरान नगरपरिषद यांचे प्राधिकरणाचे नवे **"पदसिध्द निमंत्रित"** म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

त्यानंतर विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**<u>बाब क्र.१ :</u>** **<u>दिनांक ०७ जुलै, २०२० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१४९व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>**

कार्यवृत्त कायम करण्यात आले

**<u>बाब क्र.२ :</u>** **<u>दिनांक ०७ जुलै, २०२० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१४९व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**<u>बाब क्र.३ :</u>** **<u>कु. उमा अडुसुमिल्ली, प्रमुख, नियोजन विभाग यांचा सेवाकालावधी ३ महिन्यांकरीता वाढविण्यास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.</u>**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या आस्थापनेवर प्रमुख, नियोजन विभाग या संवर्गात १ मंजूर पद असून सदर पदावर

कु.उमा अडुसुमिल्ली यांची दिनांक २८ सप्टेंबर, २००४ पासून सरळसेवेने नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच कु. उमा अडुसुमिल्ली यांच्याकडे प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक २० जुलै, २०२० पासून सोपविण्यात आलेला असून यांच्याकडे नियोजन विभाग आणि परिवहन व दळणवळण विभागांतर्गत खालील महत्त्वाची कामे तसेच विहीत कालमर्यादेत पूर्ण करावयाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पांची कामे सोपविण्यात आली आहेत :-

**नियोजन विभाग** -

१) प्रारुप प्रादेशिक योजना, २०१६ यास शासनाची मंजूरी घेणे / सुधारणा करणे

२) महानगर प्रदेशासाठी प्रादेशिक योजना तयार करणे

३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रात बांधकाम परवानगी देणे.

४) भिंवडी विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबतच्या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.

**परिवहन व दळणवळण विभाग** -

१) मेट्रो प्रकल्प २ अ व ७ च्या मेट्रो स्थानकांमध्ये बहु वाहतुक परिवहन एकत्रिकरण (Multi Modal Integration – MMI) अंमलबजावणी प्रकल्प.

२) मुंबई महानगर प्रदेशात एकात्मिक तिकिटीकरण पध्दतीची अंमलबजावणी प्रकल्प (Intigrated Ticketing System).

**३)** शहरी हवाई रज्जु मार्ग **(Urban Ropway Corridor)**

३.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, कु.अडुसुमिल्ली हया दिनांक ३० नोव्हेंबर, २०२० रोजी प्राधिकरणाच्या सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्यामुळे प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील प्रमुख, नियोजन विभाग हे पद दिनांक ०१-१२-२०२० पासून रिक्त होणार होते. कु.अडुसुमिल्ली यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेले **प्रमुख, नियोजन विभाग** हे पद भरण्याकरीता जाहिरात प्रसारीत करण्यात आली असून त्यानुसार पुढील प्रक्रिया सुरु आहे. परंतु त्याकरीता काही अवधी लागणार असल्याने, प्रकल्पांचे महत्त्व विचारात घेता व सदर प्रकल्प विहित कालावधीत विनाविलंब पूर्ण करण्याच्या दृष्टीने, प्रमुख, नियोजन विभाग या पदाकरीता योग्य उमेदवार मिळेपर्यंत कु.अडुसुमिल्ली यांच्या सेवेची प्राधिकरणास आवश्यकता असल्यामुळे त्यांना दिनांक २७-११-२०२० रोजीच्या आदेशान्वये प्राधिकरणाची कार्योत्तर मंजूरी

..४/-

मिळण्याच्या अधीन राहून **प्रमुख, नियोजन विभाग** या पदावर ३ महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी उपरोक्त प्रस्ताव प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

**३.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१५४७:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे परिच्छेद ३.२ मध्ये नमूद केलेले प्रकल्पांची कामे विहित कालावधीत विनाविलंब पूर्ण करण्याच्या दृष्टीने तसेच कु. उमा अडुसुमिल्ली यांचा सदर प्रकल्पावरील कामकाजाचा अनुभव विचारात घेता त्यांना **प्रमुख, नियोजन विभाग** या पदावर ३ महिन्याची मुदतवाढ देण्यास याद्वारे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** यासंबधी योग्य ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी कक्ष निर्माण करण्याबाबत तसेच त्या कक्षाकरीता नविन तांत्रिक / अतांत्रिक पदे निर्माण करण्याकरीता प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने मुंबई महानगर क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर महत्वपूर्ण व लोकहितार्थ प्रकल्प हाती घेतले आहेत, जसे की, विविध मेट्रो प्रकल्प, मोनोरेल प्रकल्प, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक रोड, विरार-अलिबाग बहुउद्येशिय मार्गिका व इतर अनेक महत्त्वपूर्ण रस्त्यांवरील उडडाणपुलांचा समावेश होतो. त्यापैकी मोनोरेल हा भारतात प्रथमत: राबविण्यात आलेला महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, सदर प्रकल्प दोन टप्प्यात राबविण्यात आला. टप्पा -१ मध्ये वडाळा ते चेंबूर (८.८० कि.मी. मार्गिका) आणि टप्पा -२ वडाळा ते संत गाडगे महाराज चौक (११.२० कि.मी. मार्गिका) चा समावेश आहे. सदर प्रकल्पाकरीता प्राधिकरणामार्फत मे. लार्सन ॲन्ड टुब्रो आणि स्कोमी इंजिनिअरिंग, बी.एच.डी. मलेशिया (मे. LTSE) समुहाची

कंत्राटदार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. या प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात माहे फेब्रुवारी, २००९ मध्ये सुरु झाले. वडाळा ते चेंबूर टप्पा-१ दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रवासी वाहतूकीकरीता खुला करण्यात आला.

४.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे. LTSE या समुहाकडून गैर-कामगिरी आणि कराराचे उल्लंघन झाल्याच्या कारणाने सदर कंत्राटदाराचे दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी सदर कंत्राट रद्द करण्यात आले आणि मोनोरेल प्रकल्पाचे संचलन व देखभालीचे काम प्राधिकरणाने स्वतः हाती घेतले. त्यानंतर प्राधिकरणाने परिवहन व दळणवळण विभागातील एकूण ९ अधिकारी तसेच प्रशासन विभागातून १ अधिकारी यांना मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखेअंतर्गत पूर्णतः प्रभार आणि वित्त व लेखा विभागातून १ अधिकारी यांना अतिरिक्त प्रभार दिला. मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखा सद्यास्थितीत मोनोरेल प्रकल्पाचे संचलन, देखभाल व व्यवस्थापन पाहत आहे. सध्या सदर मोनो अंमलबजावणी शाखा हा खालील नमूद केलेल्या तपशीलानुसार वेगवेगळे ७ विभाग तथा १३ उप विभागांमध्ये विभागलेला असून, मोनोरेल प्रणाली अंतर्गत वेगवेगळे कामकाज पहात आहेत.

| अनु.क्र. | विभाग | उप विभाग |
|---|---|---|
| १ | संचलन आणि देखभाल | १) संचलन, २)सुरक्षा, ३) सुरक्षितता, ४) रोलिंग स्टॉक देखभाल (यांत्रिक आणि विद्युत). |
| २ | प्रणाली | १) संकेत, २) संप्रेषण, ३)स्वयंचलित भाडे संग्रह, ४)माहिती व तंत्रज्ञान |
| ३ | पायाभूत सुविधा | १)स्थापत्य २) विद्युत |
| ४ | मनुष्यबळ आणि प्रशासन | - |
| ५ | वित्त | - |
| ६ | प्रकल्प नियोजन आणि करार | १)खरेदी व साठा, २)विधिविषयक |
| ७ | व्यावसायिक | १) तिकीट भाडे आणि इतर महसूल |

४.३ उपरोक्त नमूद विभागातील कर्मचारीवृंद हे ८ तासांच्या शिफ्टमध्ये तैनात असतात. परंतू, यंत्रणेची कार्यप्रणाली व देखभालीकरीता मनुष्यबळाची उपलब्धता २४ x ७ असणे आवश्यक आहे. मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखा सद्यास्थितीत मोनोरेल प्रकल्पाचे संचलन, देखभाल व व्यवस्थापन पाहत आहे. मोनो प्रकल्प अंमलबजावणी शाखेअंतर्गत पार पाडण्यात येत असलेल्या कामाचे मुख्यत: स्वरूप खालीलप्रमाणे आहे :-

i) मोनोरेल प्रणालीचे संचलन व देखभाली मध्ये आरएसटी, बीम स्विच, डीईक्यू, सिग्नलिंग, कम्युनिकेशन्स, ओसीसी, स्टेशन ऑपरेशन्स, सेफ्टी, सिक्युरिटी, कमर्शियल इ.चा समावेश होतो.

ii) मोनोरेल पायाभूत सुविधा जसे की, स्थापत्य आणि विद्युत इ. ची दुरुस्ती व देखभालीचे काम.

iii) मोनोरेलच्या विविध यंत्रणेतील सुटे भाग व उपभोग्य वस्तू, तसेच उपकरणे, मालमत्ता इ.ची खरेदी करण्यात येते.

iv) मोनोरेलच्या संचलन व देखभालीसाठी आवश्यक असलेल्या विविध मनुष्यबळाची तैनाती व व्यवस्थापन करणे.

v) विद्यमान मोनोरेल पायाभूत सुविधांद्वारे महसूल निर्मिती करणे, तसेच मोनोरेलशी संबंधित आर्थिक आणि कायदेशीर बाबी हाताळणे.

४.४. उपरोक्त कामे ही तांत्रिक स्वरूपाची असून, सुरळीत पार पाडण्याकरीता प्राधिकरणाच्या आस्थापनेवर स्वतंत्र **मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखा** स्थापन करण्यास मान्यता असावी. तसेच मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखेची प्रशासकीय कामे पार पाडण्याकरीता मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी निर्माण करण्यात आलेले एस-२० रु.५६,१००-१,७७,५००/- या वेतनश्रेणीतील **प्रशासकीय अधिकारी** या पदाची वेतनश्रेणी एस-२३ रु.६७,७००-२,०८,७००/- अशी श्रेणीवाढ करुन त्याचे **पदनाम प्रमुख (HR & Admn.)** असे करुन ते पद मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी विभागाकरीता वापरण्यास व त्यास सहाय्यकारी **आस्थापना अधिकारी-१ पद, कक्ष अधिकारी-१ पद आणि सहाय्यक कक्ष अधिकारी-१ पद अशी ३ पदे नव्याने** निर्माण करण्याचे देखील प्रस्तावित आहे. मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी विभागाकरीता खालीलप्रमाणे तांत्रिक व अतांत्रिक पदे निर्माण करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे :-

अ) **तांत्रिक पदे**

| अनु.क्र. | प्रस्तावित पदे | पद संख्या | वेतन (सातव्या वेतन आयोगानुसार) |
|---|---|---|---|
| ०१ | प्रमुख कार्यान्वयन अधिकारी | ०१ | एस -२९ रु १,३१,१००-२,१६,६००. |
| ०२ | उप प्रमुख कार्यान्वयन अधिकारी | ०१ | एस -२७ रु. १,१८,५००-२,१४,१००. |
| ०३ | उप महाव्यवस्थापक व्यवसायिक व नियोजन | ०१ | एस-२५ रु.७८,८००- २,०९,२००. |
| ०४ | उप महाव्यवस्थापक (संचलन व सुरक्षितता) | ०१ | एस-२५ रु.७८,८०० - २,०९,२००. |
| ०५ | उप महाव्यवस्थापक रोलिंग स्टॉक देखभाल | ०१ | एस-२५ रु.७८,८०० - २,०९,२००. |
| ०६ | उप महाव्यवस्थापक प्रणाली | ०१ | एस-२५ रु.७८,८०० - २,०९,२००. |
| ०७ | उप महाव्यवस्थापक पायाभूत सुविधा | ०१ | एस-२५ रु.७८,८०० - २,०९,२००. |

| अनु.क्र. | प्रस्तावित पदे | पद संख्या | वेतन (सातव्या वेतन आयोगानुसार) |
|---|---|---|---|
| ०८ | उप महाव्यवस्थापक प्रकल्प नियोजन आणि करार | ०१ | एस-२५ रु.७८,८०० - २,०९,२००. |
| ०९ | व्यवस्थापक व्यवसायिक व नियोजन | ०१ | एस -२३ रु.६७,७०० -२,०८,७००. |
| १० | व्यवस्थापक पायाभूत सुविधा | ०१ | एस -२३ रु.६७,७०० -२,०८,७००. |
| ११ | व्यवस्थापक प्रकल्प नियोजन आणि करार | ०१ | एस -२३ रु.६७,७०० -२,०८,७००. |

**ब) प्रशासकीय संवर्गातील अतांत्रिक पदे**

| अनु.क्र. | प्रस्तावित पदे | पद संख्या | वेतन (सातव्या वेतन आयोगानुसार) |
|---|---|---|---|
| १ | आस्थापना अधिकारी | ०१ | एस-२२ रु.६०,०००-१,९०,८००. |
| २ | कक्ष अधिकारी | ०१ | एस -१७ रु.४७,६००-१,५१,१००. |
| ३ | सहाय्यक कक्ष अधिकारी | ०१ | एस -१४ रु.३८,६००-१,२२,८००. |
| | **एकूण पदे** | **०३** | |

क) **वित्तीय कामांकरीता लेखा संवर्गातील अतांत्रिक पदे**

| अनु.क्र. | प्रस्तावित पदे | पद संख्या | वेतन (सातव्या वेतन आयोगानुसार) |
|---|---|---|---|
| १ | उप मुख्य लेखा अधिकारी | ०१ | एस-२५ रु.७८,८०० - २,०९,२००. |
| २ | सहाय्यक मुख्य लेखा अधिकारी | ०१ | एस -२३ रु.६७,७०० -२,०८,७००. |
| ३ | लेखा अधिकारी | ०१ | एस-१६ रु.४४,९००-१,४२,४०० |
| | **एकूण पदे** | **०३** | |

उपरोक्त प्रस्तावित केल्यानुसार प्राधिकरणाच्या आस्थापनेवर **मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखा** नव्याने निर्माण करण्याची व सदर शाखा सक्षमीकरणाकरीता आवश्यक तांत्रिक/अंतात्रिक अधिकारी/कर्मचा-यांची पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्याची प्राधिकरणास विनंती करण्यात येत आहे.

४.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१५४८:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये

प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे ---

१. मोनोरेल प्रकल्पाची विविध कामे विचारात घेऊन सदर प्रकल्पांच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकरणाच्या आस्थापनेवर **मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखा** नव्याने निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखेकरीता प्रशासकीय कामे पार पाडण्याकरीता, मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी निर्माण करण्यात आलेले व सध्या रिक्त असलेल्या एस-२० रु.५६,१००-१,७७,५०० या वेतनश्रेणीतील प्रशासकीय अधिकारी या पदाची वेतनश्रेणी एस-२३ रु.६७,७००-२,०८,७०० अशी श्रेणीवाढ करुन, त्याचे **प्रमुख (HR & Admn.)** असे पदनाम करुन ते पद मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखेकरीता वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखेकरीता खालील तांत्रिक व अतांत्रिक पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

**अ) तांत्रिक पदे**

| **अनु. क्र.** | **प्रस्तावित पदे** | **पद संख्या** | **वेतन (सातव्या वेतन आयोगानुसार)** |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख कार्यान्वयन अधिकारी | ०१ | एस -२९ रु १,३१,१००-२,१६,६००. |
| २ | उप प्रमुख कार्यान्वयन अधिकारी | ०१ | एस-२७ रु. १,१८,५००-२,१४,१००. |
| ३ | उप महाव्यवस्थापक व्यवसायिक व नियोजन | ०१ | एस-२५ रु.७८,८००- २,०९,२००. |
| ४ | उप महाव्यवस्थापक (संचलन व सुरक्षितता) | ०१ | एस-२५ रु.७८,८०० - २,०९,२००. |
| ५ | उप महाव्यवस्थापक रोलिंग स्टॉक देखभाल | ०१ | एस-२५ रु.७८,८०० - २,०९,२००. |
| ६ | उप महाव्यवस्थापक प्रणाली | ०१ | एस-२५ रु.७८,८०० — २,०९,२००. |
| ७ | उप महाव्यवस्थापक पायाभूत सुविधा | ०१ | एस-२५ रु.७८,८०० — २,०९,२००. |
| ८ | उप महाव्यवस्थापक प्रकल्प नियोजन आणि करार | ०१ | एस-२५ रु.७८,८०० —२,०९,२००. |
| ९ | व्यवस्थापक व्यवसायिक व नियोजन | ०१ | एस -२३ रु.६७,७०० -२,०८,७००. |
| १० | व्यवस्थापक पायाभूत सुविधा | ०१ | एस -२३ रु.६७,७०० -२,०८,७००. |
| ११ | व्यवस्थापक प्रकल्प नियोजन आणि करार | ०१ | एस -२३ रु.६७,७०० -२,०८,७००. |
| | **एकूण पदे** | **११** | |

**ब) प्रशासकीय संवर्गातील अतांत्रिक पदे**

| अनु.क्र. | प्रस्तावित पदे | पद संख्या | वेतन (सातव्या वेतन आयोगानुसार) |
|---|---|---|---|
| १ | आस्थापना अधिकारी | ०१ | एस-२२ रु.६०,०००-१,९०,८००. |
| २ | कक्ष अधिकारी | ०१ | एस -१७ रु.४७,६००-१,५१,१००. |
| ३ | सहाय्यक कक्ष अधिकारी | ०१ | एस -१४ रु.३८,६००-१,२२,८००. |
| | **एकूण पदे** | **०३** | |

**क) वित्तीय कामांकरीता लेखा संवर्गातील अतांत्रिक पदे**

| अनु.क्र. | प्रस्तावित पदे | पद संख्या | वेतन (सातव्या वेतन आयोगानुसार) |
|---|---|---|---|
| १ | उप मुख्य लेखा अधिकारी | ०१ | एस-२५ रु.७८,८०० – २,०९,२००. |
| २ | सहाय्यक मुख्य लेखा अधिकारी | ०१ | एस -२३ रु.६७,७०० -२,०८,७००. |
| ३ | लेखा अधिकारी | ०१ | एस-१६ रु.४४,९००-१,४२,४०० |
| | **एकूण पदे** | **०३** | |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांना सन २०१९-२०२० च्या वित्तीय वर्षासाठीच्या सानुग्रह अनुदानास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे स्थानिक प्राधिकरण असल्यामुळे दिनांक २८ सप्टेंबर, २००६ रोजी झालेल्या ११७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र.१०९७ अन्वये प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचा-यांना सन २००५-०६ या वित्तीय वर्षापासून सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर सन २००६-०७ पासून प्राधिकरणाने कमाल मर्यादेला अधीन राहून ८.३३% इतके सानुग्रह अनुदान मंजूर केले होते. सन २०११-१२ या वित्तीय वर्षापासून प्रत्येक वर्षी १०% इतकी वाढ करुन सानुग्रह अनुदानाच्या रकमेस प्राधिकरणाने मान्यता दिली होती. त्यानुसार सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या सानुग्रह अनुदानाची रक्कम मंजूर करताना त्यामध्ये १०% वाढ मंजूर करून प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना रु.३१,९००/- इतकी सानुग्रह अनुदानाची रक्कम मंजूर करण्यात आली.

५.२ प्राधिकरणातील अधिकारी, मागासवर्गीय व कर्मचारी संघटनेच्या वतीने सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदानाच्या रक्कमेमध्ये १०% वाढ करण्यात यावी अशी विनंती प्राधिकरणाकडे करण्यात आली होती.

५.३ सन २०१९-२०२० या वर्षाकरिता मागील वर्षाच्या रक्कमेइतकीच रु.३१,९००/- इतके सानुग्रह अनुदान रक्कम मंजुर करण्याकरिता प्रस्ताव मा. मंत्री, नगर विकास तथा अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे सादर करण्यात आला व त्यास मा. मंत्री, नगर विकास तथा अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार अधिकारी/कर्मचारी यांना रु.३१,९००/- इतके सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे. सदर अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदानापोटी सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरिता रू.२,०९,४०,६४३/- इतका अंदाजित खर्च झालेला आहे.

५.४ प्राधिकरणाच्या या बैठकीमध्ये सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरिता प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्येकी रु.३१,९००/- इतक्या सानुग्रह अनुदानास कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१५४९:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, प्राधिकरण याव्दारे मुं.म.प्र.वि.प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरीता रु.३१,९००/- इतके सानुग्रह अनुदान मंजूर करण्यास याव्दारे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.६</u> : <u>प्राधिकरणाचा सन २०१९-२० चा वार्षिक अहवाल.</u>**

६.१ प्राधिकरणाचा सन २०१९-२०२० चा वार्षिक अहवाल सादर करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे विविध योजना व प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येते, त्याबाबतची एका वर्षाची माहिती वार्षिक अहवालात समाविष्ट करण्यात आलेली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन २०१९-२०२० चा वार्षिक अहवाल प्राधिकरणाच्या बैठकीपुढे मंजूरीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २४ अन्वये प्राधिकरणाने (दिनांक ३१ मार्च रोजी समाप्त होणारे) प्रत्येक वर्ष संपल्यानंतर, मागील वर्षाच्या कार्याचा अहवाल तयार करुन तो राज्य शासनास दिनांक ३० नोव्हेंबर पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार २०१९-२०२० चा वार्षिक अहवाल प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

त्यानंतर, प्राधिकरणाचे सन २०१९-२०२० च्या वार्षिक अहवालास मान्यता दिली आणि पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१५५०</u>:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन २०१९-२०२० च्या वार्षिक अहवालास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे व हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.७</u> : <u>प्राधिकरणाचे सन २०१९-२० चे वार्षिक लेखे.</u>**

७.१ प्राधिकरणाचा सन २०१९-२० या वर्षाच्या वार्षिक लेख्याबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वित्तीय) विनियम, १९७६ च्या नियम (फ) अन्वयें आवश्यक असल्याप्रमाणे प्राधिकरणाचे (मुं.म.प्र.वि.प्रा. निधी)

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे लेख्यासह खालील लेखे तयार करुन मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत :-

| | |
|---|---|
| (१) | मुं.म.प्र.वि.प्रा. मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधी विनियम, १९८९ च्या कलम १०(५) अन्वयें आवश्यक असल्याप्रमाणे नागरी विकास प्रकल्प फिरता निधीचा जमाखर्च व ताळेबंद. |
| (२) | मेगासिटी योजना फिरता निधीचा जमाखर्च व ताळेबंद. |
| (३) | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (कर्मचारी अंशदायी भविष्य निर्वाह निधी) विनियम, १९७९ अन्वयें मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी अंशदायी भविष्य निर्वाह निधीचा जमाखर्च व ताळेबंद. |

७.२ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, सन २०१९-२० मध्ये रु.९३९६.२५ कोटी प्राप्त झाले असून रु.१००७५.५७ कोटी विविध प्रकल्पांवर खर्च झालेले आहेत.

७.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१५५१:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वित्तीय) विनियम, १९७६ च्या नियम १३ (फ) अन्वयें प्राधिकरणाचे सन २०१९-२० या वर्षाचे लेखे संमत करण्यात येत आहेत. प्राधिकरणाचे सन २०१९-२० या वर्षाचे आयकर विवरणपत्र विश्वस्थ संस्था म्हणून आयकर कार्यालयाकडे सादर करण्यास व आयकर कलम ११ नुसार कार्यवाही करण्यास तसेच प्राधिकरणाने विविध प्रकल्पावर केलेल्या खर्चामधून प्राधिकरणाची कोणतीही मालमत्ता तयार होत नसल्यामुळे प्रकल्पावरील झालेला खर्च महसूली खर्च म्हणून लेख्यामध्ये दाखविण्यास मान्यता देण्यात येत आहे."

"**असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की,** ठरावाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत."

**<u>बाब क्र.८</u> : <u>प्राधिकरणाचा सन २०२१-२२ चा वार्षिक कार्ये कार्यक्रम.</u>**

८.१ महानगर आयुक्तांनी सन २०२१-२२ च्या वार्षिक कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती सांगितली. तसेच या वर्षात राबविण्यात येणा-या महत्वपूर्ण योजना / प्रकल्पांची माहिती थोडक्यात सांगितली. प्राधिकरण पुढील आर्थिक वर्षात एकूण ९७ प्रकल्प/ योजना राबविणार आहे.

सन २०२१-२२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.१२९६९.३५ कोटी इतका खर्च होणार आहे. या वर्षात राबविण्यात येणा-या महत्वपूर्ण योजनांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | योजनेचे नाव | रक्कम (कोटीत) |
|---|---|---|
| १. | मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प – वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर (MRTS) (भू-संपादनासह) | ८४.८० |
| २. | मोनो रेल प्रकल्प (भू-संपादनासह) | १२०.२० |
| ३. | एकीकृत मुंबई महानगर परिवहन प्राधिकरणाचे अंतर्गत (UMMTA) ITS आणि इतर प्रकल्प | ०.५० |
| ४. | मेट्रो मार्ग ७ उन्नत पादचारी मार्गांचे बांधकाम करण्यासाठी अभियांत्रिकी संरचना, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती व प्रकल्प अंमलबजावणी. | १००.०० |
| ५. | कांजूरमार्ग ते बदलापूर या मार्गाकरीता योग्य जलद परिवहन सेवेची अंमलबजावणी | १०.०० |
| ६. | पश्चिम द्रुतगती महामार्गावर प्रवेश नियंत्रण शहरी संरेखन, वाहतूक प्रणाली संरेखन तसेच मुंबईत वाढील वाहतुकीसाठी सिग्नल फ्री जंक्शन (Access control system on WEH) आणि अंमलबजावणी | ५०.०० |
| ७. | सिटी पार्क ते महाराष्ट्र निसर्ग उद्यान दरम्यान पादचारी झुलता पुल | ७७.०५ |
| ८. | मेट्रो प्रकल्प मार्ग २ अ : दहिसर-चारकोप-मानखुर्द (दहिसर ते डी.एन.नगर अंधेरी) | ७००.६५ |
| ९. | मेट्रो प्रकल्प २ ब : डी. एन. नगर ते मंडाळे | ४७३.५५ |
| १० | मेट्रो प्रकल्प ३ : कुलाबा - वांद्रे - सीप्झ (मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन) | २५०.०० |
| ११. | मेट्रो प्रकल्प ४ : वडाळा - घाटकोपर - मुलुंड - ठाणे - कासारवडवली | ८९०.८५ |
| १२. | मेट्रो प्रकल्प ४ अ : कासारवडवली - गायमुख | १७६.७० |
| १३. | मेट्रो प्रकल्प ५ : ठाणे - भिवंडी – कल्याण | ३१८.०५ |
| १४. | मेट्रो प्रकल्प ६ : स्वामी समर्थ नगर - JVLR - सीप्झ् - कांजुरमार्ग - विक्रोळी EEH | ४००.१० |
| १५. | मेट्रो प्रकल्प ७ : अंधेरी – पूर्व ते दहिसर – पूर्व | ९९९.४५ |
| १६. | मेट्रो प्रकल्प - मार्ग - ९ : दहिसर ते मिरा-भाईंदर व ७ अ (अंधेरी ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ) | ३२०.१० |
| १७. | मेट्रो प्रकल्प १० : गायमुख - शिवाजी चौक (मिरा रोड) | ११.०० |
| १८. | मेट्रो प्रकल्प ११ : वडाळा- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | १७.०५ |
| १९. | मेट्रो प्रकल्प १२: कल्याण – डोंबिवली – तळोजा | १२.०० |
| २०. | मेट्रो प्रकल्प १३ : घोडबंदर - विरार | १.७५ |
| २१. | मेट्रो भवन | ८४.०० |
| २२. | मेट्रो - कर्मचारी निवासस्थाने | ३१.०० |
| २३. | महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ (M३) | २४४.३० |
| २४. | पायाभूत सोयीसुविधासह मुंबई महानगर क्षेत्रात भाडेतत्वावर निवासस्थाने बांधणे | १०४.९० |

| अ. क्र. | योजनेचे नाव | रक्कम (कोटीत) |
|---|---|---|
| २५. | वांद्रे-कुर्ला संकुलात सुधारणा व नागरी सुविधा | ६०.०० |
| २६. | ओशिवरा जिल्हा केंद्राची पायाभूत सुविधा कामे (भू-संपादनासह) | १०.०० |
| २७. | मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (भू-संपादनासह) | १२४.५० |
| २८. | विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प राबविणे (भू-संपादनासह) | ७७६.८५ |
| २९. | स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारक उभारणे | १००.०० |
| ३०. | वडाळा ट्रक  टर्मिनल बांधकाम | १०.०० |
| ३१. | मुंबई पारबंदर छन्नमार्ग (शिवडी ते न्हावा शेवा) | २९००.३५ |
| ३२. | पुनर्वसन व पुनर्वसाहत सुविधा | २०.०० |
| ३३. | वरळी ते शिवडी उन्नत मार्ग | १००.०० |
| ३४. | टिकुजीनीवाडी (ठाणे) ते संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (बोरीवली) ६पदरी भुयारी मार्ग | १००.०० |
| ३५. | मुंबई महानगर प्रदेशातील बाहय रस्ते सुधारणा | १४०.०० |
| ३६. | सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता—विस्तारीत तसेच वांद्रे-कुर्ला संकुल ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत उन्नत मार्ग | २००.०० |
| ३७. | अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यावरील नरसी मेहता रस्त्यावर जागृती नगर मेट्रो स्थानकाखाली पुलाचे बांधकाम | ८.८५ |
| ३८. | पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शन, घाटकोपर — पूर्व येथील उन्नत मार्ग सुधारणा | ६०.०० |
| ३९. | पुर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गाची देखभाल व दुरुस्ती | २००.०० |
| ४०. | वडाळा भारवाहक तळ येथील इमारतीचे बांधकाम | ७.०० |
| ४१. | राष्ट्रीय सुरक्षा गास्दे (NSG) जोगेश्वरी येथे मिठी नदीवरील पुल | ५.०० |
| ४२. | इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक बांधणे | २२८.६० |
| ४३. | प्रादेशिक स्तरावर जलस्त्रोताचा विकास - सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना | ६१३.३५ |
| ४४. | वांद्रे कुर्ला संकुलाचे सुशोभिकरण / विकास | ४०.०० |
| ४५. | मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (भू-संपादनासह) | ४०५.०० |
| ४६. | इतर संकीर्ण प्रकल्पांवरील तरतूद | ३८४.७० |
| ४७. | प्रशासकीय खर्च, भांडवली खर्च | ५४८.६० |
| ४८. | कर्ज वितरण, अनुदाने आणि अभ्यास | ४४८.५५ |
|  | **एकूण :-** | **१२९६९.३५** |

८.२ चर्चेनंतर, प्राधिकरणाने वार्षिक कार्यक्रमांना मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१५५२:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, टिप्पणीसह सादर केलेल्या २०२१-२०२२ सालचा वार्षिक कार्ये कार्यक्रम व २०२१-२०२२ सालाचा मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीचा वार्षिक कार्यक्रम आणि महानगर योजना - फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्यक्रमास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : प्राधिकरणाचे सन २०२१-२२ चे अर्थसंकल्पीय अंदाज**

९.१ महानगर आयुक्तांनी प्राधिकरणाचा सन २०२१-२२ चा अर्थसंकल्प सादर केला. प्राधिकरणाचे २०२०-२१ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०२१-२२ चे वार्षिक अंदाजपत्रकाविषयी माहिती देताना असे नमूद केले की, सन २०२१-२२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.९८३३.७५ कोटी इतकी रक्कम जमा होईल असे अपेक्षित आहे. यात प्रामुख्याने जमिन विक्रीपोटी रु.८२०.६५ कोटी, शासनाचे अनुदान/विकास हक्क हस्तांतरण रु.५०६.४० कोटी, नागरी परिवहन निधी रु.५००.०० कोटी, आंतरराष्ट्रीय संस्थांकडून कर्ज रु.५४८०.२५ कोटी, ठेवीवरील व्याज रु.२९०.०० कोटी, महानगरपालिका/नगरपालिकांकडून कर्ज परतफेड व त्यावरील व्याज रु.१६४.२५ कोटी, विकास आकार रु.१३.१० कोटी, संकीर्ण जमा (निविदा प्रपत्राची विक्री व जमिन भाडेपट्टी आकारावरील व्याज) रु.१०६७.०५ कोटी, मोनो रेल मधून मिळणारे प्रवासी भाडे रु.२९.२५ कोटी व इतर जमा रु.९६२.८० कोटी यांचा समावेश आहे. सन २०२०-२१ चे अर्थसंकल्प सादर करताना एकूण रु.१२५४९.१५ कोटी इतकी रक्कम जमा होईल असे अपेक्षित होते. माहे जानेवारी, २०२१ अखेरपर्यंत प्राप्त झालेल्या रक्कमांचा विचार करता सुधारीत अर्थसंकल्पात जमा रक्कमा रु.७८२६.०५ कोटीची तरतूद केली आहे.

९.२ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, सन २०२१-२२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.१२९६९.३५ कोटी इतकी रक्कम खर्च होईल असे अपेक्षित आहे. यात प्रामुख्याने मेट्रोसाठी सुमारे रु.४५७१.२५ कोटी रुपयांची तरतूद, मुंबई पारबंदर छन्नमार्ग (MTHL) शिवडी ते न्हावाशेवा जलसेतू रु.२९००.३५ कोटी, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प रु.४०५.०० कोटी, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प व विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (भूसंपादनासह) - रु.९०१.३५ कोटी, मोनो रेल्वेसाठी रु.१२०.२० कोटी, टिकुजीनीवाडी ते

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ६ पदरी भुयारी मार्ग रु.१००.०० कोटी, मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहय क्षेत्रातील रस्ते सुधारणा रु.१४०.०० कोटी, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचे कुर्ला (सी.एस.टी.रोड) ते वाकोला पुलापर्यंत विस्तारीकरण करणे तसेच वांद्रे कुर्ला संकुल ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत उन्नत मार्ग बांधणे रु.२००.०० कोटी, पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शंन, घाटकोपर (पुर्व) येथील उन्नतमार्ग सुधारणा करणे रु.६०.०० कोटी, कलिना विद्यापीठात पायाभूत सुविधा पुरविणे रु.१.०० कोटी, पुर्व व पश्चिम द्रुतगती मार्गाची देखभाल व दुरुस्ती रु.२००.०० कोटी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथे भव्य स्मारक रु.२२८.६० कोटी, स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारक उभारणे रु.१००.०० कोटी, प्रादेशिक स्तरावर जलस्त्रोताचा विकास - सुर्या प्रकल्प, काळू प्रकल्प रु.६१३.३५ कोटी, होमगार्ड इमारत बांधकाम रु.१७.०० कोटी, मुंबई महानगर क्षेत्रात निवासस्थाने बांधणे रु.१०४.९० कोटी, मार्वे-भाईंदर-घोडबंदर सागरी किनारा रस्त्याचे बांधकाम रु.१.५० कोटी, अंधेरी-घाटकोपर जोडरस्स्त्यावरील नरसी मेहता रस्त्यावर जागृती नगर मेट्रो स्थानकाखाली पुलाचे बांधकाम रु.८.८५ कोटी, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता व वांद्रे- कुर्ला संकुल यांना जोडणारा ३० मी. रुंद डी.पी. रस्ता रु.०.५० कोटी, महा मुंबई सार्वजनिक कलाकृती प्रकल्प / वांद्रे कुर्ला संकुल कला महोत्सव रु.२.०० कोटी, राष्ट्रीय सुरक्षा गारद (NSG) जोगेश्वरी येथे मिठी नदीवरील पुल रु.५.०० कोटी व इतर संकीर्ण प्रकल्पावर रु.१२९१.३५ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. सर्वेक्षण व अभ्यासासाठी रु.३४.९० कोटी, अनुदाने रु.१४०.४५ कोटी, स्थानिक संस्थांना कर्जे/मेगासिटी कर्जाची परतफेड रु.२७३.२० कोटी, प्रशासकीय खर्च व डेड स्टॉक या करीता रु.५४८.६० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. वरील बाबी विचारात घेता सन २०२१-२२ या वर्षात रु.१२९६९.३५ कोटी इ तका खर्च अपेक्षित आहे. प्राधिकरणाचा सन २०२१-२२ मधील उत्पन्न रु.९८३३.७५ कोटी व खर्च रु.१२९६९.३५ कोटीचा विचार करता या वर्षामध्ये रु.३१३५.६० कोटीची तूट दिसून येत आहे व हि तूट प्राधिकरणाकडे असलेल्या निधीतून भागविण्यात येईल.

९.३ त्यानंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीसह प्रस्तावित केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार करुन मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१५५३ :-**

**"असा ठराव करण्यात येतो की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) अन्वयें प्राधिकरणाच्या अंदाजित जमा रु.९८३३.७५ कोटी व

खर्च रु.१२९६९.३५ कोटी दर्शविणारा २०२१-२०२२ सालाचा अर्थसंकल्प आणि २०२०-२०२१ सालचे सुधारीत अंदाजपत्रकास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधी अंदाजित जमा रु.२१४.९५ कोटी व खर्च रु.१०.०० कोटी आणि महानगर योजना – फिरता निधी यांचे अंदाजित जमा रु.५२.६८ कोटी व खर्च रु.६२.९२ कोटी दर्शविणारे सन २०२१-२०२२ चे अर्थसंकल्पीय अंदाज व २०२०-२०२१ चे सुधारीत अंदाजास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे योजना, सर्वेक्षणे इत्यादी कार्यक्रम अहवाल आणि मंजूर अर्थसंकल्पात समाविष्ट न केलेल्या प्रत्येकी रु. १ कोटी पेक्षा कमी असलेल्या बाबींना मंजूरी देण्याचा / खर्च करण्याचा अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या विविध विशेष नियोजन क्षेत्रामध्ये (SPA) विकास प्रस्तावांबाबत भरावयाचे अधिमूल्य हप्त्याने भरण्याची सुविधा मिळणेबाबत तसेच रियल इस्टेटमधील मंदी व कोव्हिड-१९ महामारीमुळे (मार्च-२०२० ते डिसेंबर-२०२०) या कालावधीमध्ये येणाऱ्या इमारत परवानग्यांना या कालावधीसाठी (९ महिने) वाढ मिळण्याबाबत MCHI-CREDAI यांच्या विनंतीनुसार मा. अध्यक्षांच्या परवानगीने निर्गमित केलेल्या परिपत्रकास कार्योत्तर मंजूरी मिळण्याबाबत.**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, राज्य शासनाने 'मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची' मुंबई महानगर प्रदेशामधील (MMR) काही क्षेत्रासाठी "विशेष नियोजन प्राधिकरण" (SPA) म्हणून नियुक्ती केली आहे. यामध्ये वांद्रे-कुर्ला संकुल, वडाळा ट्रक टर्मिनल, ओशिवरा डिस्ट्रीक सेंटर, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसुचित क्षेत्र व इंदु मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे विशेष नियोजन क्षेत्र (SPA) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत आहेत, तर भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्र, कल्याण ग्रोथ सेंटर, अंबरनाथ-कुळगांव बदलापूर परिसर अधिसूचित क्षेत्र ही विशेष नियोजन क्षेत्र (SPA) मुंबई महानगरपालिकेच्या हद्दी बाहेरआहेत.

१०.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की,

**(अ)** MCHI-CREDAI यांनी रियल इस्टेटमधील मंदीच्या अनुषंगाने या प्राधिकरणाकडे व शासनाकडे दिनांक १२ जुन, २०२० रोजीच्या पत्रान्वये

विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत चालू असणाऱ्या विकसनासाठी (प्रोजेक्टसाठी) भरणा करायचे विविध अधिमूल्य हे हप्त्याने (Installment) भरण्याची सुविधा मिळणेसाठी विनंती केली आहे.

**(ब)** केंद्र शासनाच्या दिनांक २८ मे, २०२० व राज्य शासनाच्या दिनांक ०४जुन,२०२० रोजीच्या आदेशानुसार कोविड-१९ या जागतिक महामारीचा विचार करुन मार्च, २०२० ते डिसेंबर, २०२० पर्यंत भरण्याच्या हप्त्याची अंतिम तारीख डिसेंबर, २०२० पर्यंत वाढवून द्यावी व त्याचे व्याज आकारु नये याबाबत देखील धोरण करावे अशी विनंती MCHI-CREDAI यांनी दिनांक १६ जुलै, २०२० व दिनांक ०३ ऑगस्ट, २०२० रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

१०.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की,

**(अ)** बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या परिपत्रकाद्वारे विकास प्रस्तावांबाबत अधिमूल्य हप्त्याने भरण्याची सुविधा (Facility) तयार केली असून शासनाने दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या पत्राद्वारे ती योजना इतर प्राधिकरण व 'मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने' देखील अवलंबावी असे कळविले आहे. राज्य शासनाच्या दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या या पत्रानुसार म्हाडा व झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण यांनी देखील असेच धोरण त्यांच्या सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीने त्यांच्या क्षेत्रासाठी लागू केले आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेने सुध्दा अशा प्रकारचे धोरण त्यांच्या महासभेच्या मंजूरीने अवलंबिले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने देखील हे धोरण अवलंबण्यास हरकत नाही. तथापि हे धोरणाचे अवलंबन करायचे असल्यास त्यापूर्वी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या 'कलम (२२म)'अंतर्गत प्राधिकरणाची अनुमती घेणे आवश्यक आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे परिपत्रकानुसार इमारत प्रस्तावांना खालील अधिमूल्य हप्त्याने भरण्यास सुविधा दिली आहे.

(i) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील विनियम क्र.३० अनुसार अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक अधिमूल्यासाठी,

(ii) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील विनियम क्र.३३ अनुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक अधिमूल्यासाठी,

(iii) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील विनियम क्र.३१ (३) अनुसार फंजिबल चटईक्षेत्र निर्देशांक अधिमूल्यासाठी,

(iv) जिना उदवाहने यांचे क्षेत्र व चटई क्षेत्र निर्देशांक गणनेतून माफ करण्याबद्दल अधिमूल्यासाठी,

(v) इमारत सभोवतालच्या जागेत तूट असल्यास आकारायचे अधिमूल्यासाठी (Open space deficiency premium).

**(ब)** रियल इस्टेटमधील मंदी व कोविड-१९ महामारीमुळे (मार्च, २०२० ते डिसेंबर, २०२०) या कालावधीमध्ये येणाऱ्या विकास परवानग्यांना या कालावधीसाठी (९ महिने) वाढ मिळण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक २८ मे, २०२० रोजी मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. त्यानुसार राज्य शासनाने दिनांक ०४ जुन, २०२० रोजी 'महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील 'कलम १५४' अन्वये आदेश पारित केले आहेत. त्याच अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३१ जुलै, २०२० रोजी परिपत्रक निर्गमित केले असून मार्च, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीमध्ये येणाऱ्या विकास परवानग्यांना ९ महिन्यांसाठी पुर्नविधी ग्राहयता (Revalidation) मंजूरी दंड न लावता द्यावी याबाबत सुचना दिल्या आहेत.

१०.४ महानगर आयुक्त यांनी आणखी पुढे असेही सांगितले की, विषयांकीत प्रकरणी मुं.म.प्र.वि.प्रा.चे मा.अध्यक्ष यांना दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजी महानगर आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला होत :-

१०.४.१(अ) मुंबई महानगर क्षेत्रामधील बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील प्राधिकरणाच्या विशेष नियोजन क्षेत्रासाठी (म्हणजेच-कुर्ला संकुल, वडाळा ट्रक टर्मिनल ओशिवरा डिस्ट्रीक सेंटर, मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट व इंदु मिल) शासनाने दिनांक १९सप्टेंबर,२०१९ रोजीच्या पत्रातील आदेशान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १७सप्टेंबर,२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार विकास प्रस्तावांचे अधिमूल्य हप्त्याने भरण्याबाबतचा निर्णय त्वरीत अवलंबन करावयास मा. अध्यक्ष, प्राधिकरण यांनी मान्यता द्यावी.

**(ब)** मुंबई महानगर क्षेत्रामधील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्राबाहेरील प्राधिकरणाच्या विशेष नियोजन क्षेत्रासाठी (म्हणजेच भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्र, कल्याण ग्रोथ सेंटर, अंबरनाथ-कुळगांव बदलापूर परिसर अधिसूचित क्षेत्र) देखील 'बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १७ सप्टेंबर,२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार' विकास प्रस्तावांचे अधिमूल्य हफ्त्याने भरण्याबाबतचा निर्णय अवलंब करणेबाबत 'महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या 'कलम(२२म)' अंतर्गत प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता देणे सापेक्ष मा. अध्यक्ष, प्राधिकरण यांनी मान्यता द्यावी.

**१०.४.२** राज्य शासनाने दिनांक ०४ जुन,२०२० रोजी 'महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील 'कलम १५४' अन्वये निदेश पारित केले आहेत. त्याच अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३१ जुलै,२०२० रोजी परिपत्रक निर्गमित केले असून मार्च, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीमध्ये येणाऱ्या विकास परवानग्यांना ९ महिन्यांसाठी पुर्नविधी ग्राहयता (Revalidation) मंजूरी दंड न लावता द्यावी याबाबत सुचना दिल्या आहेत. सबब, बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३१ जुलै,२०२० रोजीच्या परिपत्रकामधील पुर्नविधीग्राह्यता (Revalidation) दंड न लावता

वाढ देण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने दिनांक ०४ जुन, २०२० रोजी 'महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६' मधील 'कलम १५४' अन्वये पारित केलेल्या ओदशानुसार प्राधिकरणाच्या सर्व विशेष नियोजन क्षेत्रांना (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील) म्हणजेच वांद्रे-कुर्ला संकुल, वडाळा ट्रक टर्मिनल, ओशिवरा डिस्ट्रीक सेंटर, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसुचित क्षेत्र, इंदु मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्र, कल्याण ग्रोथ सेंटर, अंबरनाथ-कुळगांव बदलापूर परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी लागू करण्यास मा. अध्यक्ष, प्राधिकरण यांनी मान्यता द्यावी.

१०.५ महानगर आयुक्त यांनी त्यानंतर आणखी पुढे असेही सांगितले की, मा. अध्यक्ष, प्राधिकरण यांनी माहे सप्टेंबर,२०२० वरिल प्रस्तावास पुढील प्रमाणे मान्यता दिली आहे:

प्राधिकरणाची पुढील बैठक होण्यासाठी काही कालावधी लागू शकतो, ही बाब विचारात घेता तसेच MCHI-CREDAI यांची विंनती विचारात घेता तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकाच्या १७ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या परिपत्रकावर आधारीत असलेले दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनाने कळविलेले आदेश विचारात घेऊन प्राधिकरणाच्या येत्या बैठकीत कार्योत्तर मंजुरी प्राप्त केली जाईल या अटीसापेक्ष माननीय मंत्री, नगर विकास तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांनी बाब टिप्पणीतील परिच्छेद ४.१(अ), ४.१(ब) ४(२) मधील प्रस्तावाची अंमलबजावणी प्राधिकरणाच्या सर्व विशेष नियोजन क्षेत्रांसाठी लागू करण्याबाबत माहे सप्टेंबर, २०२० मध्ये मान्यता दिली आहे. तसेच त्याअनुषंगाने महानगर आयुक्त यांना आवश्यकतेनुसार वेळोवेळी आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकृत केले आहे.

१०.६. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मा. अध्यक्ष, प्राधिकरण यांच्या मान्यतेनुसार प्राधिकरणाने दिनांक १० सप्टेंबर,२०२० रोजी परिपत्रके निर्गमित केली आहेत:

**(अ)** मा. मंत्री, नगर विकास तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांचे मान्यतेनुसार महानगर आयुक्त यांनी विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत चालू असणा-या विकसनासाठी (प्रोजेक्टसाठी) भरणा करावयाचे विविध अधिमूल्य हे हप्त्याने (installment) भरण्याची सुविधा देणेसंदर्भात प्राधिकरणाच्या मुंबई महापालिका हद्दीतील व मुंबई महापालिका हद्दीबाहेरील सर्व विशेष नियोजन क्षेत्रांसाठी दिनांक १० सप्टेंबर,२०२० रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे.

**(ब)** तसेच मार्च, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीमध्ये येणा-या विकास परवानग्यांना ९ महिन्यांसाठी पुर्नविधी ग्राहयता (Revalidation) मंजूरी दंड न लावता देणे बाबत प्राधिकरणाच्या सर्व विशेष नियोजन क्षेत्रांसाठी दिनांक १० सप्टेंबर,२०२० रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे.

१०.७. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की :

बाब टिप्पणीमध्ये सादर केलेले मुद्दे विचारात घेता खालील प्रस्ताव प्रधिकरणाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करीत आहे :-

(१) (अ) शासनाच्या दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजीचे आदेशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बृहन्मुंबई मधील विशेष नियोजन क्षेत्रांसाठी विकास प्रस्तावांसाठीचे आवश्यक अधिमूल्य हप्त्याने भरण्यास कार्योत्तर मान्यता द्यावी.

(ब) मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बृहन्मुंबई बाहेरील विशेष नियोजन क्षेत्रासाठी देखील विकास प्रस्तावांसाठीचे आवश्यक अधिमूल्य हप्त्याने भरण्यास कार्योत्तर मान्यता द्यावी.

(२) 'मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सर्व विशेष नियोजन क्षेत्रांसाठी' मार्च, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीमध्ये विकास प्रस्तावांना महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०४ जुन,२०२० रोजीचे आदेशान्वये दंड न आकारता पुर्नवि धीग्राह्यता वाढ देण्यास कार्योत्तर मान्यता द्यावी.

(३) वरिल प्रस्तावांसाठी महानगर आयुक्त यांचे स्वाक्षरीने दिनांक १० सप्टेंबर, २०२० रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकांस कार्योत्तर मान्यता द्यावी.

(४) वरिल अनुषंगाने आवश्यकतेनुसार वेळोवेळी आवश्यक ती कार्यवाही करण्यास व या परिपत्रकामध्ये आवश्यक ते बदल करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता द्यावी.

१०.८ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१५५४:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा व त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन शासनाच्या दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजीचे आदेशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बृहन्मुंबई मधील विशेष नियोजन क्षेत्रांसाठी' विकास प्रस्तावांसाठीचे आवश्यक अधिमूल्य हप्त्याने भरण्यास मा. अध्यक्ष यांनी यापुर्वी दिलेल्या मान्यतेस कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बृहन्मुंबई बाहेरील विशेष नियोजन क्षेत्रासाठी देखील विकास प्रस्तावांसाठीचे आवश्यक अधिमूल्य हप्त्याने भरण्यास मा. अध्यक्ष यांनी यापुर्वी दिलेल्या मान्यतेस कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सर्व विशेष नियोजन क्षेत्रांसाठी 'मार्च २०२० ते डिसेंबर २०२०' या कालावधीमध्ये विकास प्रस्तावांना महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०४ जुन, २०२० रोजीचे आदेशान्वये दंड न आकारता पुर्नविधी ग्राह्यता वाढ देण्यास मा. अध्यक्ष यांनी यापुर्वी दिलेल्या मान्यतेस कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** मा. अध्यक्षयांच्या मंजूरीनंतर प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजूरी मिळण्याच्या अधिन राहुन वरिल प्रस्तावांसाठी महानगर आयुक्त यांचे स्वाक्षरीने दिनांक १०सप्टेंबर,२०२० रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकांस कार्योत्तर मान्यता देत आहे.**"**

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** वरिल अनुषंगाने आवश्यकतेनुसार वेळोवेळी आवश्यक ती कार्यवाही करण्यास व या परिपत्रकामध्ये आवश्यक ते बदल करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

**<u>बाब क्र.११</u>** : <u>मेट्रो मार्ग-**२**ब डि.एन.नगर ते मंडाळे या मेट्रो **मार्गिकेतील एमएमआरडीए मेट्रो स्थानक व कुर्ला टर्मिनल मेट्रो स्थानक (कुर्ला मेन लाईनला लागून पश्चिमेकडे) वगळण्यासाठी मंजुरी देणेबाबत.**</u>

११.१ उपरोक्त प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, शासन निर्णय क्र. एमआरडी-३३१६/प्र.क्र./नवि-७, दि. २५.१०.२०१६ तसेच दि.१७.०३.२०१६ रोजीच्या १३९व्या बैठकीतील बाब क्र. ४ अन्वये प्राधिकरणास मेट्रो मार्गांच्या मार्गिकेमध्ये तसेच मेट्रो स्थानकांमध्ये गरज वाटल्यास किरकोळ बदल करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मेट्रो मार्ग २ब प्रकल्पामधील प्रस्तावित एमएमआरडीए मेट्रो स्थानक प्रस्तावित कलानगर उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी व कुर्ला टर्मिनल मेट्रो स्थानक लागोपाठची दोन स्थानके कमी अंतरावर आहेत.

११.२ महानगर आयुक्त यांनी असे नमुद केले की एमएमआरडीए मेट्रो स्थानक एमएमआरडीए जंक्शनच्या आधी बांधणे प्रस्तावित होते. तसेच या ठिकाणी कलानगर उड्डाणपुलाचे कामही प्रस्तावित होते. या प्रकल्पांच्या मुळ आराखडयानुसार कलानगर उड्डाणपूलाचा रॅम्प संपल्यावर एमएमआरडीए मेट्रो स्थानक सुरु होऊन ते एमएमआरडीए जंक्शनआधी संपणे प्रस्तावित होते. परंतू, उड्डाणपूलाच्या सविस्तर संकल्पना दरम्यान पूलाच्या रॅम्पची लांबी वाढल्याने मेट्रो स्टेशनखाली रॅम्पच्या काही लांबीचे बांधकाम करणे आवश्यक ठरत होते. त्याअनुषंगाने कलानगर जंक्शन येथील मेट्रो मार्ग २ब आणि कलानगर उड्डाणपुलाचे स्ट्रक्चरल एकत्रीकरण व बांधकाम टाळण्यासाठी तसेच कलानगर उड्डाणपुलाच्या उतारामुळे (रॅम्पवर) मेट्रो मार्ग २ब चे संरेखन बाधित होऊ नये म्हणून मेट्रो २ब मार्गाचे संरेखन (अलाइनमेंट) रस्त्याच्या दुभाजकाऐवजी उजवीकडे असलेल्या पदपथावर स्थानातंरीत करण्याचे प्रस्तावित आहे. मेट्रो मार्ग २ब ची संरेखन उजवीकडील पदपथावर बदलल्यानंतर, उजवीकडे असलेल्या मेकर मॅक्स सीटीच्या अस्तित्वातील इमारतींमुळे प्रस्तावित एमएमआरडीए मेट्रो स्थानक पदपथावर बांधणे शक्य होणार नाही. तसेच ज्या ठिकाणी मेट्रो मार्ग संरेखन बीकेसी रस्त्याच्या दुभाजकावर येते. त्याठिकाणी एमएमआरडीए मेट्रो स्थानक प्रस्तावित केल्यास, एमएमआरडीए मेट्रो स्थानक व त्यापुढील

आय.टी.ओ. मेट्रो स्थानकादरम्यान नगण्य अंतर राहते. सबब मेट्रो मार्ग बी.के.सी. रस्त्याच्या उजवीकडून प्रस्तावित असल्याने प्रस्तावित एम.एम.आर.डी.ए. स्थानक रद्द करणे आवश्यक ठरते. तसेच, बीकेसी जी-ब्लॉकच्या प्रवाशांच्या सोयीसाठी आयटीओ मेट्रो स्थानक एमएमआरडीए जंक्शनकडे २२२ मीटर स्थलांतरीत करणे योग्य ठरेल. यास्तव, मेट्रो मार्ग २ब मेट्रो स्थानकापासून मेट्रो मार्ग ३ बीकेसी स्थानकापर्यंत १० मी रुंदीचा (मेट्रो पिअर सोडून ८ मी. रुंद) पादचारी पुल प्रस्तावित आहे. तसेच मेट्रो मार्ग ३च्या बी.के.सी. भूमिगत स्थानकासाठी एमएमआरसीएलकडून उजव्या व डाव्या अशा दोन्ही बाजुकडील पदपथावर मेट्रो एस्कलेटर उभारुन ते प्रस्तावित आय.टी.ओ. मेट्रो स्थानकाच्या वरील पादचारी पूलास जोडण्यात येतील. प्रस्तावित मेट्रो स्थानकांच्या एकत्रिकरणासाठी आवश्यक अतिरिक्त कामाची किंमत रु. १७.३३ कोटी अपेक्षित आहे. एमएमआरडीए मेट्रो स्थानक वगळल्यामुळे प्रकल्प किंमतीत रु.२४.४२ कोटी रक्कमेची बचत होणे अपेक्षित आहे. सबब वरील अतिरिक्त कामांची किंमत अपेक्षित बचतीपेक्षा कमी असल्याने प्रकल्प किंमतीत सुमारे रु. ७.११ कोटी बचत अपेक्षित आहे.

११.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमुद केले की, वरीलप्रमाणे मेट्रो मार्ग २ब मार्गिकेचे सुधारित संरेखन सद्यस्थितीत बांधकाम पूर्ण होत असलेल्या कलानगर उड्डाणपुलाच्या रॅम्प "क" व रॅम्प "ड" मधुन प्रस्तावित होते. सदर कलानगर उड्डाणपुलाचे काम लवकरच पूर्ण करणे प्रस्तावित असल्याने, उड्डाणपुलाचे काम पुर्ण झाल्यावर प्रस्तावित मेट्रो मार्गिकेच्या काही पिअर्सचे बांधकाम उड्डाणपुलाच्या बांधकामाबरोबर करणे आवश्यक होते. तसेच मेट्रो मार्ग २ब चे कंत्राट कामाच्या संथगतीमुळे रद्द करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने मेट्रो मार्ग २ब च्या सुधारित संरेखनानुसार काही खांबांचे (पिअर्सचे) बांधकाम उड्डाणपुलाच्या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आले आहे. वरील सर्व कामे अत्यंत अडचणी व गुंतागुंतीची असूनसुद्धा एमएमआरडीएने ही सर्व कामे यशस्वीरीत्या पूर्ण केली आहेत. तसेच सुधारित संरेखनानुसार उजवीकडील पदपथावर येणाऱ्या पायाचे (foundations) काम देखील काही प्रमाणात पुर्ण करण्यात आले आहे.

११.४ महानगर आयुक्तम यांनी असेही नमूद केले की, स.गो.बर्वे स्थानक आणि पुढील कुर्ला टर्मिनल स्थानक यामधील मध्य ते मध्य (सेंटर टू सेंटर) अंतर फक्त ४७४ मीटर होते. तसेच सदर दोन स्थानकादरम्यान स्पष्ट अंतर (क्लिअर अंतर) फक्त २८८ मीटर होते. सदर कुर्ला टर्मिनल स्थानकाचे बांधकामात अस्तित्वातील एस.सी.एल.आर.-रेल्वे उड्डाण पूलाचे सॉलिड रॅम्प बाधित होत आहे. भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या (AAI) फनेल झोन मुळे

स्थानकांचे प्रस्तावित ठिकाणी मर्यादित उंची अनुज्ञेय आहे. स्थानकांच्या एका बाजूस एस.सी.एल.आर.- रेल्वे उड्डाणपूल असून स-या बाजूस पक्की बांधकामे असलेल्या इमारती आहेत. सबब या जागेवरील मेट्रो स्थानकापर्यंत प्रवाशांसाठी सुयोग्य पोहोच रस्ता उपलब्ध नाही. मेट्रो मार्ग २ब चे साधारण सल्लागार M/s. AICA Consortium ने कळविल्याप्रमाणे कुर्ला टर्मिनल मेट्रो स्थानक वगळल्यामुळे स.गो. वर्बे मार्ग स्थानक व पुढील कुर्ला पुर्व मेट्रो स्थानक यामधील अंतर १२७९.२० मी असेल.

११.५ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग २ब मार्गिकेत एस.जी. बर्वे मार्ग व कुर्ला टर्मिनल ही स्थानके कुर्ला पश्चिम क्षेत्रात व कुर्ला पुर्व हे स्थानक कुर्ला पुर्व क्षेत्रात अशी एकूण तीन मेट्रो स्थानके कुर्ला येथील रेल्वे मार्गाच्या पश्चिमेस व पुर्व बाजूस प्रस्तावित होती. उपरोक्त कारणांमुळे कुर्ला टर्मिनल स्थानक वगळल्यानंतर मेट्रोचे प्रस्तावित कुर्ला पुर्व स्थानक हे कुर्ला व टिळक नगर या रेल्वे स्थानकांस व लोकमान्य टिळक टर्मिनसला जोडणे प्रस्तावित आहे. एमएमआरडीए मेट्रो स्थानक व कुर्ला टर्मिनल मेट्रो स्थानक वगळल्यामुळे रु.४८.८४ कोटी एवढी प्रकल्प खर्चात बचत होणे अपेक्षित आहे.

११.६ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, उपरोक्त बाबीं विचारात घेता, एमएमआरडीए मेट्रो स्थानक व कुर्ला टर्मिलन मेट्रो स्थानक वगळल्याने प्रवांशाची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. सबब उपरोक्त तांत्रिक कारणास्तव एमएमआरडीए मेट्रो स्थानक व कुर्ला टर्मिनल मेट्रो स्थानक ही दोन स्थानके मेट्रो मार्ग २ब प्रकल्पातून वगळण्याचे प्रस्तावित आहे.

११.७ मा. मंत्री, अध्यक्ष, प्राधिकरण, नगर विकास तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांनी कुर्ला टर्मिनल स्थानक वगळल्याने स.गो. बर्वे मार्ग स्थानकानंतरचे स्थानक कुर्ला पुर्व स्थानक होईल ही बाब निदर्शनास आणली. सबब सदर स्थानक पूर्ण कुर्ला क्षेत्रासाठी असल्याने कुर्ला पूर्व स्थानकाचे नाव बदलून त्या स्थानकाचे नाव कुर्ला टर्मिनल स्थानक ठेवावे अशी सूचना केली.

११.८ बाब टिप्पणीतील मुद्दे, प्रस्तावाचे सादरीकरण यावर विचार करुन व सविस्तर चर्चा करून बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला:-

**ठराव क्र.१५५५:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये

प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे एमएमआरडीए मेट्रो स्थानक आणि जुने कुर्ला टर्मिनल मेट्रो स्थानक रद्द करुन कुर्ला पुर्व स्थानकाचे नाव बदलून सदर स्थानकाचे नाव कुर्ला टर्मिनल स्थानक ठेवले.

१. मेट्रो मार्ग २ब मार्गिकेतील एमएमआरडीए मेट्रो स्थानक व कुर्ला टर्मिनल मेट्रो स्थानक वगळण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाकडून शासनाकडे मंजूरीसाठी सादर करणे.

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत"

**<u>बाब क्र.१२</u> : मेट्रो मार्ग-२ब डि.एन.नगर ते मंडाळे या मेट्रो मार्गिकेचे मंडाळे स्थानकापासून पुढे चिता कॅम्प पर्यंत विस्तारीकरण व चिता कॅम्प येथे स्थानक प्रस्तावास व विस्तारीकरणाच्या वाढीव किंमतीस मान्यता मिळणेबाबत.**

१२.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाची आखणी डि.एन.नगर, अंधेरी (प) - वांद्रे (प) - वांद्रे कुर्ला संकुल - कुर्ला - चेंबूर - मानखुर्द - मंडाळे अशी आहे. सदर आखणीस प्राधिकरणाच्या दि. १७/०३/२०१६ रोजी झालेल्या १३९ व्या बैठकीत व महाराष्ट्र शासनाच्या दि. २५/१०/२०१६ रोजीच्या निर्णयान्वये मेट्रो मार्ग-२ब (डि. एन. नगर - मंडाळे) या उन्नत मेट्रो मार्गाची उभारणी करणे व या प्रकल्पासाठी लागणाऱ्या रु.१०,९८६/- कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मेट्रो मार्ग २ब या प्रकल्पाचा दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन यांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सदर मेट्रो मार्गाचे अंतिम स्थानक महाराष्ट्र नगर, मंडाळे येथे नियोजित असून मंडाळे येथे मेट्रो मार्ग २ब करिता डेपो प्रस्तावित आहे. तथापि स्थानिक लोकप्रतिनिधी व श्री. नवाब मलिक, मा. मंत्री, अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता यांनी विस्तारीकरणाच्या मागणीस अनुसरुन विविध पर्याय व त्यातील समस्या इत्यादी बाबींवर बैठका घेतल्या तसेच प्रत्यक्ष पाहणी केली. चिता कॅम्प अणुशक्ती नगर येथील स्थानिक लोकप्रतिनिधीनींकडून मेट्रो मार्ग २ब चा विस्तार महाराष्ट्र नगर, मंडाळे पासून पुढे चिता कॅम्पपर्यंत करणेबाबत तसेच चिता कॅम्प येथे मेट्रो स्थानक बांधणेबाबत वेळोवेळी मागणी करण्यात आली.

१२.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे निर्देशित केले की, मंडाळे डेपोच्या दक्षिण सीमेकडील जमिनीलगतचा एकेरी मार्ग व नाल्यानजीक चिता कॅम्पसाठी मेट्रो स्थानक बांधण्यासाठी प्रस्ताव सादर करावा. तसेच सदर मेट्रो मार्गासाठी मंजूर डीपीप्रमाणे महाराष्ट्र नगर ते नाला क्रॉसिंग (प्रस्तावित चिता कॅम्प स्थानकपर्यंत) या लांबीतील रस्त्याचे ३६.६० मी. रुंदीकरण बृहन्मुंबई महानगर पालिकेमार्फत करावे असे सुचित केले. तसेच एम.जी. रामचंद्रन रोड ते नाला क्रॉसिंग (डेपो) पर्यंतचे रुंदीकरण व पुनर्वसन प्राधिकरणाकडून करावे असे सुचित केले.

१२.३ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, उपरोक्तप्रमाणे मेट्रो मार्ग २ब चे साधारण सल्लागार यांनी डेपोच्या दक्षिण सीमेकडील जमिनीलगतच्या एकेरी मेट्रो मार्गाच्या पर्यायाबाबत अभ्यास करुन प्राथमिक अहवाल प्राधिकरणास दि. २३/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे. सदर अहवालाचा संक्षिप्त तपशिल पुढीलप्रमाणे आहे:-

**अ. ठळक वैशिष्ट्ये :**

१. मेट्रो मार्ग २ब मार्गिकेच्या एकेरी मार्गाचे डेपोच्या दक्षिण सीमेकडील जमिनीलगत विस्तारीकरण.
२. प्रस्तावित मंडाळे स्थानक व चिता कॅम्प स्थानक यामधील अंतर १०५४ मी.
३. विकास आराखड्यातील ३६.६० मी रस्त्यावर मेट्रोचे आरेखन (६ मी. रुंदी).
४. विस्तारीकरणाची अंदाजे किंमत – रु. १७१.३७ कोटी (जमीन व पुनर्वसन खर्च वगळून).
५. अतिरिक्त पुनर्वसन, सुमारे ३५०० घरे यातील प्राधिकरणामार्फत करण्यात येणाऱ्या रस्ता रुंदीकरणामध्ये सुमारे १२०० घरे आवश्यक व उर्वरित घरे महानगरपालिकेकडून करण्यात येणाऱ्या रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक.
६. अस्तित्वातील सेवावाहिन्या हलविणे (१००० मि. मी. सिवर लाईन, ६०० मि. मी. जल वाहिनी, अदानी एच.टी. केबल्स).

**ब. सदर विस्तारीकरणाच्या अंदाजित खर्चाबाबतच्या मुख्य बाबी पुढीलप्रमाणे आहेत:-**

| **अ. क्र.** | **तपशील** | **अंदाजे खर्च** रु. (कोटी) |
|---|---|---|
| १ | मेट्रो मार्गिका व स्थानकाचे बांधकाम, विद्युत आणि यांत्रिक कामे, सिग्नलिंग आणि टेलिकम्युनिकेशन आणि रेल्वे ट्रॅकची कामे इ. | ७२.०५ |
| २ | रस्ता रुंदीकरण | २३.३९ |
| ३ | विविध सेवा वाहिन्यांचे स्थानांतरण | ४२.९० |

..२९/-

| अ. क्र. | तपशील | अंदाजे खर्च रु. (कोटी) |
|---|---|---|
| ४ | डिजाईन चार्जेस आणि इतर खर्च | १०.२२ |
| ५ | आकस्मिक खर्च | ४.४६ |
| ६ | वस्तू व सेवा कर १२% | १८.३६ |
| | **एकूण** | **१७१.३७** |

१२.४ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, उपरोक्तप्रमाणे साधारण सल्लागार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मेट्रो मार्ग २ब चे चिता कॅम्प पर्यंतच्या एकेरी मार्गाचे विस्तारीकरण व चिता कॅम्प येथे मेट्रो स्थानकाचे बांधकाम या कामाच्या रु. १७१.३७ कोटी अंदाजित किंमतीस प्राधिकरणाची मान्यता घेणेकरिता प्रस्ताव सादर केला आहे. मान्यतेनंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. तसेच सदर मेट्रो मार्ग २ब च्या विस्तारीकरणाच्या संदर्भात केंद्र शासनाच्या सुधारित अधिसुचनेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल व त्यांनतर कामाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करता येईल.

१२.५ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पण्णीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१५५६:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मेट्रो मार्ग-२ब डि.एन.नगर ते मंडाळे या मेट्रो मार्गिकेचे मंडाळे स्थानकापासून पुढे चिता कॅम्पपर्यंत विस्तार करणेसाठी मंडाळे डेपोच्या दक्षिण सीमेकडील जमिनीलगतचा एकेरी मेट्रो मार्ग व नाल्यानजीक चिता कॅम्प येथे मेट्रो स्थानक बांधणे या विस्तारीकरणाच्या प्रस्तावास आणि त्यासाठी रु. १७१.३७ कोटी इतक्या वाढीव किंमतीस मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर विस्तारीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (डि. एम. आर. सी.) अथवा साधारण सल्लागार मार्फत तयार करून सदर अहवाल शासनाकडे सादर करण्यास व पुढे केंद्र शासनातर्फे सुधारित अधिसुचना जारी करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : मुंबई मेट्रो मार्ग-७ (अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व)) या मेट्रो मार्गाचे न्यू अशोक नगर मेट्रो स्थानक व दिंडोशी मेट्रो स्थानक वगळण्यासाठी मंजुरी देणेबाबत.**

१३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मूळ आराखडयाप्रमाणे जेव्हीएलआर मेट्रो स्थानक हे जेव्हीएलआर जंक्शनच्या दक्षिणेस नियोजीत होते. पाहणी दरम्यान लक्षात आले की हे स्थानक बांधण्याकरिता महामार्गालगतचा सेवारस्ता बांधकामादरम्यान पूर्णपणे बंद करावा लागेल. तेथील दाट लोकवस्ती व वाहतूक लक्षात घेता सेवारस्ता बंद करणे व्यवहार्य नव्हते. तसेच सेवारस्ता महामार्गाच्या सुमारे ४ ते ५ मीटर खालील पातळीवर आहे व महामार्ग रस्ता संरक्षक भिंतीच्या सहायाने बांधण्यात आलेला आहे. येथे स्थानक बांधल्यास संरक्षक भिंत पूर्णपणे तोडावी लागली असती, त्यामुळे महामार्गाच्या सुरक्षिततेचा व पुर्नबांधकामाचा प्रश्न उदभवत होता. त्यामुळे जेव्हीएलआर स्थानकापासून पठाणवाडी या दरम्यान मेट्रो स्थानकांचे पुर्नविलोकन करण्याचे ठरविले. मे. डीएमआरसी यांनी संपूर्ण मेट्रो मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केली तसेच वाहतूक नियोजन, बांधकामांची व्यवहार्यता (रचनात्मक), मेट्रो प्रवाशांची संख्या आदी बाबींचा सखोल अभ्यास करण्यात आला.

१३.२ महानगर आयुक्तांनी पुढे असेही नमूद केले की, मेसर्स दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने मेट्रो मार्ग ७ च्या स्थानकांच्या सखोल अभ्यासाअंती सुचविल्यानुसार काही स्थानकांचे स्थलांतर करण्यात आले व न्यू अशोक नगर वगळण्याची शिफारस केली. वरील विषयाबाबत माहिती देताना संचालक (प्रकल्प) यांनी असे सांगितले की, जोगेश्वरी मेट्रो स्थानक हे जेव्हीएलआर जंक्शनच्या उत्तरेस सुमारे ४०० मीटरने पुढे स्थलांतरीत करण्यात आले. जोगेश्वरी स्थानकाच्या प्रस्तावित नव्या स्थानकाबरोबरच पुढील आरे जंक्शनपर्यंतच्या मेट्रो मार्गाचा संयुक्तिक विचार करण्यात आला. हब मॉल, बॉम्बे एक्झिबीशेन सेंटर व अन्य व्यावसायिक आस्थापनांचा विचार करता, प्रस्तावित महानंद स्थानक हे १०० मी. ने उत्तरेस स्थलांतर करण्यात आले. त्यानंतर न्यू अशोक नगर स्थानक आणि महानंद स्थानक या दोन स्थानकांमधील अंतर ५०९ मीटर होते.

तसेच न्यू अशोक नगर स्थानकाच्या बांधकामासाठी पश्चिमेकडील व्यावसायिक गाळे/निवासी सदनिका यांचे मोठया प्रमाणात अधीग्रहण करावे लागणार होते व त्यास स्थानिकांचा प्रखर विरोध होता. न्यू अशोक नगर येथील मेट्रो प्रवासी, महानंद व आरे या दोन स्थानकांचा वापर करु शकतात. वरील तांत्रिक बाबींचा विचार करता व स्थानिकांचा प्रखर विरोध लक्षात घेता न्यु अशोक नगर स्थानक वगळण्यात आले.

१३.३ संचालक (प्रकल्प) यांनी पुढे असे नमूद केले की, प्रस्तावित पठाणवाडी स्थानक येथे महामार्गालगतचा सेवा रस्ता अस्तित्वात नाही. तसेच तेथून महानगर गॅस लिमीटेड, जलवाहीनी आदी महत्वाच्या भूमिगत सेवावाहिन्या कार्यरत आहेत. मूळ ठिकाणी हे स्थानक बांधल्यास रस्त्यावरील वाहतूकीची कायमस्वरुपी कोंडी झाली असती. तसेच बांधकामानंतर भूमिगत वाहीन्यांची दुरुस्ती व देखभाल करणे अशक्यप्राय झाले असते. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, पठाणवाडी स्थानक दक्षिणेकडे २३० मी. ने स्थलांतरीत करण्यात आले. सद्याचे पठाणवाडी स्थानक व जुने दिंडोशी स्थानक या मधील अंतर केवळ ४७३ मी. एवढे होते. हे अंतर कमी असल्याने जुने दिंडोशी स्थानक वगळण्यात आले आहे. प्रस्तावित पठाणवाडी मेट्रो स्थानक २३० मीटरने दक्षिणेस स्थलांतरित करुन त्यास दिंडोशी स्थानक नाव देण्यात आले. वरील बदल केल्यानंतर जेव्हीएलआर, महानंद, आरे आणि दिंडोशी स्थानकांमधील अंतर १ किमी असणार आहे.

१३.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१५५७:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मेट्रो मार्ग ७: अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) या मार्गावरील न्यू अशोक नगर मेट्रो स्थानक व जुने दिंडोशी स्थानक वगळण्यास आणि प्रस्तावित पठाणवाडी मेट्रो स्थानक २३० मीटरने दक्षिणेस स्थलांतरित करुन त्यास दिंडोशी स्थानक नाव देण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की**, सदर प्रस्ताव राज्य शासनाच्या मंजूरीसाठी पाठवण्यास मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ : पूर्व द्रुतगती महामार्गाच्या पृष्ठभागाचे मजबूतीकरण व नूतनीकरण करणे, फुटपाथ व गटर दुरूस्ती करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूक करणे, इतर संलग्न कामे करणे.**
**- कार्योत्तर प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

१४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देतांना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पूर्व द्रुतगती महामार्ग हा मुंबई महानगर क्षेत्रातील सर्वाधिक महत्त्वाच्या तीन रस्त्यांपैकी एक आहे. मुंबईतून उत्तर-मध्य-पूर्व महाराष्ट्र/भारतात जाणा-या वाहतुकीसाठी हाच महामार्ग वापरला जातो. ह्या महामार्गावरील सरासरी वाहतूक वर्दळ ही दररोज सुमारे ३.४० लक्ष पीसीयू एवढी आहे. ह्या महामार्गाची लांबी सायन (साखळी क्र. ५८४/७५० कि. मी.) ते गोल्डन डाईज जंक्शन, ठाणे (सा. क्र. ५६१/२०० कि. मी.) अशी २३.५५ कि. मी. आहे. मुख्य मार्गावर प्रत्येक दिशेस ३.५ मी. रुंदीच्या ५ मार्गिका असुन बहुतांश लांबीत दोन मार्गिकांच्या रुंदीचा सेवा रस्ता अस्तित्वात आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सेवा रस्ते महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत. सदर महामार्गावर १३ उड्डाणपूल असून त्यातील ८ उड्डाणपूल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या देखरेखीखाली आहेत. कामकाजाच्या सोयीसाठी सदर महामार्ग ५ भागांत विभागण्यात आलेला आहे. सदर महामार्ग एप्रिल, २०१९ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास हस्तांतरित करण्यात आला. त्यापूर्वी किमान ५ ते ७ वर्षे ह्या महामार्गाच्या पृष्ठभागाचे नूतनीकरणाचे काम करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर महामार्गावर आता खड्डे पडण्याचे तसेच पृष्ठभाग खडबडीत होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच फूटपाथ व गटार खराब होण्याचे प्रमाण ही वाढले आहे. सन २०२० मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे महामार्गाची लक्षणीय क्षती झालेली आहे.

१४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मा.श्री.आदित्य ठाकरे, पालकमंत्री, मुंबई उपनगर जिल्हा, यांनी ही सदर महामार्गाची सर्वंकष सुधारणा करण्याच्या सूचना दि.०९ सप्टेंबर, २०२० रोजीच्या बैठकीत दिलेल्या आहेत. त्यास अनुसरून महानगर आयुक्त

यांनी महामार्गाची सर्वकष दुरूस्ती हाती घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सदर महामार्गाच्या पृष्ठभागाचे पूर्ण लांबी व रुंदीमध्ये पृष्ठभागाचे नूतनीकरण, काही भागाचे मजबूतीकरण, डांबरीकरण, इत्यादी तसेच फुटपाथ व गटारची दुरूस्तीची कामे हाती घेणे आवश्यक झाले आहे. क्षेत्रीय स्तरावर संपूर्ण रस्त्याचे व पदपथाचे सर्वक्षण करून, रस्त्याचे नुतनीकरण व डांबरीकरण कामाचे व पदपथ व त्याखालील गटाराचे दुरूस्ती/ नुतनीकरण करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना शुल्क अदायगी करणे, इ. कामांकरीता रु. ३४३.८७ कोटी इतक्या रक्कमेची सविस्तर अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी तयार करण्यात आली आहेत. सदर अंदाजपत्रकीय रक्कमेस महानगर आयुक्त यांच्या दिनांक ०२/११/२०२० रोजीच्या कार्यालयीन टिप्पणीस मा. मंत्री, नगर विकास, महाराष्ट्र राज्य व अध्यक्ष, मुं. म. प्र. वि. प्राधिकरण यांची दिनांक ०४/११/२०२० रोजी मान्यता प्राधिकरणाच्या बैठकीच्या मान्यतेच्या अधिन राहून प्रदान झालेली आहे.

१४.३ महानगर आयुक्त यांनी पूढे असे सांगितले की, पूर्व द्रुतगती महामार्ग परदेशी धर्तीवर वाहतूकीस सुलभ, तांत्रिक दृष्टया सक्षम, उच्च दर्जाचा व किफायतशीर तसेच सौदर्यपूर्ण असावा, अश्या स्वरूपाचा प्राधिकरण स्तरावर संकल्पना असल्याने, महानगर आयुक्त यांना अभिप्रेत संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याकरिता मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग यांच्या सूचनेनुसार तांत्रिक मान्यतेस्तव अंदाजपत्रके बनविण्यासाठी भारतीय प्रौद्योगिक संस्थान, मुंबई (IIT) संस्थेचा सल्ला घेण्यात आला. सदर संस्थेच्या प्रतिनिधीमार्फत संपूर्ण रस्त्यांची दि. ११/११/२०२० रोजी प्रत्यक्ष पहाणी करून तद्नंतर त्यांनी सुचविल्याप्रमाणे नेटवर्क सर्व्हे व्हेहिकल (NSV) व्दारे अद्यावत तंत्रज्ञानाच्या मदतीने रस्त्याच्या पृष्ठभागाची सखोल तपासणी करण्यात आली. भारतीय प्रौद्योगिक संस्थान, मुंबई (IIT) मार्फत संपूर्ण रस्त्यांच्या लांबी व रुंदीमध्ये नुतनीकरणासाठी/डांबरीकरणासाठी Microsurfecing, Polymer Modified Bitumen व Glass Grid Beed, इत्यादी बाबींचा समावेश अंदाजपत्रकात समाविष्ट करण्याबाबत कळविलेले आहे. त्याअनुषंगाने रस्त्याचे नुतनीकरण व डांबरीकरण कामाचे व पदपथ व त्याखालील

गटाराचे दुरूस्ती/ नुतनीकरण कामांचे प्राप्त शाखानिहाय अंदाजपत्रक रु. २२४.६१ कोटी इतका बनविण्यात आला असून त्याबाबतचा गोषवारा खालीलप्रमाणे :—

| | |
|---|---|
| एकूण अंदाजपत्रकीय किंमत (पृष्ठभागाचे नुतनीकरणाची ५ कामे व फुटपाथ, गटर दुरुस्तीची २ कामे) | रू.१८६,८१,६५,१५३/- |
| वस्तू व सेवा कर (१२ %) | रू.२२,४१,७९,८१८/- |
| भारतीय प्राद्योगिक संस्था, मुंबई यांचेकडून घेण्यात येणा-या कामाची गुणवत्ता चाचणी शुल्क (१%) | रू.१,३३,८१,४२७/- |
| प्रकल्प व्यवस्थापन शुल्क (२.५%) | रू.३,३४,५३,५६७/- |
| एकूण किंमत | रू.२१३,९१,७९,९६५/- |
| आकस्मिक खर्च (५%) | रू.१०,६९,५८,९९८/- |
| एकूण किंमत | रू.२२४,६१,३८,९६३/- |
| एकूण किंमत | रू.२२४.६१ कोटी |

१४.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, तांत्रिक मान्यता प्राप्तीअंती कामाच्या निविदा दि. २२/०१/२०२१ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येऊन काम निविदा स्तरावर आहे. सदर कामावर देखरेख करण्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ असे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

१४.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१५५८:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम, (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे पूर्व द्रुतगती महामार्गाच्या पृष्ठभागाचे नूतनीकरण करणे, काही भागांचे मजबूतीकरण करणे, फुटपाथ व गटरची दुरूस्ती करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणुक करणे व इतर संलग्न कामे करणेकरीता सदरहू प्रस्तावातील सुधारित किमंतीच्या रु. २२४.६१ कोटी रक्कमेच्या कामास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : पश्चिम द्रुतगती मार्गावरील माहिम जंक्शन ते दहिसर टोल नाका या लांबीमधील उर्वरित लांबीतील रस्त्याचे नुतनीकरण आणि इतर संलग्न कामे जसे उड्डाणपुलाचे रंगकाम, पर्जन्य वाहिन्यांचे पुर्नबांधकाम, पदपथाची दुरूस्ती इ. तसेच सदर कामांकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणे या कामाकरीता कार्योत्तर प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

१५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पश्चिम द्रुतगती महामार्ग हा मुंबई महानगर क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचा रस्ता असून या महामार्गाची लांबी २५.३३ कि.मी. आहे. हा महामार्ग राष्ट्रीय महामार्गापेक्षा उन्नत दर्जाचा आहे. दि. १८/०६/२०१९ रोजीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णयान्वये पश्चिम द्रुतगती महामार्ग मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाकडे कायमस्वरुपी हस्तांतरीत केला आहे. या हस्तांतरणापुर्वी किमान ५ ते ७ वर्षे या महामार्गाच्या पृष्ठभागाचे सलगरित्या नुतनीकरण करण्यात आलेले नाही. प्राधिकरणाच्या दि. १२/०१/२०१८ रोजीच्या १४४ व्या बैठकीत महामार्गाच्या पृष्ठभागाच्या नादुरूस्त भागाचे डांबरीकरणाने नुतनीकरण करण्याच्या रु. ५८.१२ कोटी आणि रु. ३३.९२ कोटी अंदाजित रक्कमेच्या दोन कामांस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. सदरची मंजुरी महामार्गाच्या अंशत: भागातील डांबरीकरणाचे नुतनीकरण करण्याची होती. त्यानुसार ही कामे उपलब्ध जागेत पुर्ण करण्यात आली आहेत. महामार्गाच्या माहिम जंक्शन कि.मी. ५२७.६८० ते कि.मी. ५१९.०० अंधेरी कुर्ला जंक्शन ही लांबी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राधिकरणाकडे दि. १८/०६/२०१९ रोजी पुन्हा वर्ग करण्यात आल्याने या लांबीतील रू. ५५.७६ कोटी रक्कमेच्या तीन कामांस प्रशासकीय मान्यता प्रदान केली असुन यापैकी सुमारे ९०% कामे पुर्ण झाली आहेत. महामार्गाच्या पृष्ठभागाचे नुतनीकरण करण्याच्या कामांमध्ये एकुण सलग लांबीचे काम प्रस्तावित करण्यात आले नव्हते. या लांबीत मेट्रो लाईन -७ आणि २ अ चे काम प्रगतीपथावर असल्याने व या कामाचे प्रथम प्राधान्य असल्याने महामार्गाच्या लांबीतील हा भाग उपरोक्त नुतनीकरणाच्या प्रस्तावातुन वगळण्यात आला होता. तसेच महामार्गाच्या मोठ्या लांबीत शहरातील महत्वाच्या सेवावाहिन्या टाकण्याचे काम प्रगतीपथावर असल्याने असे क्षेत्र देखील अंदाजपत्रकातून वगळण्यात आले होते. अशा लांबीत महामार्गाच्या नुतनीकरणाचे काम

शक्य झाले नाही. महामार्गावरील पदपथ आणि पर्जन्य वाहिन्यांची लांबी सुमारे १०० कि.मी. आहे. या पर्जन्य वाहिन्यांची देखभाल त्यांच्या बांधकामानंतर कधीही झालेली आढळली नाही. रस्त्याच्या नुतनीकरण न झालेल्या पृष्ठभागाची स्थिती खराब झाली आहे.

१५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, खेरवाडी वांद्रे येथील मुख्य मार्गिकेलगत असलेल्या ग्रीन नाल्याच्या भिंती काही लांबीत कोसळल्या आहेत व नाल्यावर उभारण्यात आलेले छत पुर्णत: निकामी झाले आहे. नाल्याच्या या लांबीचे पुर्नबांधकाम करण्याच्या अनुषंगाने वीरमाता जीजाबाई टेक्नोलॉजिकल इन्स्टिट्युट (VJTI) या संस्थेकडून नाल्याच्या सदर कामाबाबतचा तांत्रिक प्रस्ताव मागविण्यात आला होता. त्यानुसार असा प्रस्ताव या संस्थेकडून अंदाजपत्रकासह प्राप्त झाला.

१५.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमुद केले की, दि. ०९/०९/२०२० रोजीच्या बैठकीत मा. श्री. आदित्य ठाकरे, पालकमंत्री, मुंबई उपनगर जिल्हा यांनी पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या सर्वकंष सुधारणा करणेच्या सुचना दिल्या आहेत. यानुसार पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या एकूण लांबीच्या उर्वरीत क्षेत्रातील रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण, पदपथ व पर्जन्य वाहिन्यांची दुरूस्ती, प्राधिकरणाच्या अखत्यारितील ६ उड्डाणपूल व ४ वाहन भुयारी मार्गांचे रंगकाम करणे इ. कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आली आहेत. अंदाजपत्रकाच्या एकूण अंदाजित रक्कम रू. २२१.८२ कोटी एवढी आहे. या अंदाजित रक्कमेमध्ये १२% वस्तु व सेवा कर, लेबर सेस ०.५०%, कामाचा आकस्मिक खर्च ४%, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क २.५०% यांचा समावेश करण्यात आला आहे. सदरची अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाच्या SSR २०१९-२० आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या SOR २०१८-१९ नुसार तयार करण्यात आली आहे. या सर्व कामांत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याकरिता तरतुद करण्यात आली आहे.

१५.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमुद केले की, वरील कांमाची तातडीची गरज विचारात घेता अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेऊन, कामाच्या व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुकीबाबतच्या निविदा मागविणे इ. कामे हाती घेण्याबाबत मंजूरी मिळणेस्तव कार्यालयीन टिप्पणीद्वारे विनंती करण्यात आलेली होती. दि. ०२/११/२०२० रोजीच्या उपरोक्त कार्यालयीन टिप्पणीस मा. मंत्री, नगरविकास, महाराष्ट्र राज्य व अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी

दि. ०४/११/२०२० रोजी मान्यता प्रदान केली आहे. या मंजुर प्रस्तावात माहिम जंक्शन ते दहिसर चेक नाका या लांबीतील रस्त्यांचे नुतनीकरण करण्याची ५ कामे व पर्जन्य वाहिन्या, पदपथाचे नुतनीकरण करणे व अन्य सलग्न ५ कामे आणि ग्रीन नाल्याचे पुर्नबांधकाम करणे या कामांचा समावेश आहे. अंदाजपत्रकामध्ये १२% वस्तु व सेवा कर, लेबर सेस ०.५०%, कामाचा आकस्मिक खर्च ४%, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क २.५०% इ. खर्च समाविष्ट करण्यात आला आहे.

१५.५ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, या मंजुरी अन्वये कामांच्या आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याकरीता प्रत्येकी ६ निविदा मागविण्यात आल्या. त्यामध्ये महामार्गाच्या पृष्ठभागाचे डांबरी भागाचे नुतनीकरण करण्याकरीता २ निविदा, महामार्गावरील अन्य संलग्न कामांच्या, जसे उड्डाणपूलांचे रंगकाम, पर्जन्य वाहिन्यांचे पुर्नबांधकाम व पदपथाची दुरूस्ती इ., ३ निविदा आणि खेरवाडी वांद्रे येथील ग्रीन नाल्याचे नुतनीकरणाची १ निविदा यांचा समावेश आहे. निविदांची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

१५.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमुद केले की, सदर कामे तातडीने हाती घेण्यासाठी मा. नगर विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य व अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी रू. २२१.८२ कोटीच्या कामास मंजुरी प्रदान केली असल्याने सदरहू प्रस्तावास प्राधिकरणाकडुन कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

१५.७ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१५५९:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे पोटकलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे पश्चिम द्रुतगती महामार्गावरील माहिम जंक्शन ते दहिसर टोल नाका या लांबीमधील उर्वरीत लांबीतील रस्त्याचे नुतनीकरण आणि इतर सलग्न कामे जसे उड्डाणपूलांचे रंगकाम, पर्जन्य वाहिन्यांचे पुर्नबांधकाम व पदपथाची दुरूस्ती इ. तसेच या कामांच्या देखरेखीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणुक करणे इत्यादी कामांच्या रु. २२१.८२ कोटी अंदाजित खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच याव्यतिरीक्त कंत्राटातील तरतुदीनुसार देय असणारी भाववाढ अनुज्ञेय असेल.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**<u>बाब क्र.१६</u> : <u>पश्चिम द्रुतगती मार्गावरील Domestic and International Airport येथे नियंत्रित प्रवेश मार्ग (Access Control) करीता उन्नत (Flyover)/ भुयारी मार्ग (Vehicular Underpass).</u>**

**१. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ डोमॅस्टीक टर्मिनल (T१) जवळ पश्चिम द्रुतगती महामार्गावर भूयारी मार्गाचे बांधकाम करणे आणि कि.मी.५+३०० ते कि.मी. ६+१०० मधील उड्डाणपूलाचे रूंदीकरणाचे बांधकाम करून सुधारिकरण करणे**

**२. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (T२) टर्मिनल जवळ पश्चिम द्रुतगती महामार्गावर कि.मी. ६+१४० ते कि.मी. ६+९५० येथे भूयारी मार्गाचे बांधकाम करून सुधारीकरण करणे**

**- कार्योत्तर प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

१६.१ महानगर आयुक्त यांनी सदर कामांबद्दल विस्तृत माहिती दिली. परिवहन व वाहतूक सेवामधील सुधारणांच्या उपाय-योजनांमुळे पश्चिम द्रुतगती मार्ग हा पूर्णत: नियंत्रित प्रवेश मार्ग (Access Control) होणार आहे. त्याकरीता प्राधिकरणाच्या (परिवहन व दळणवळण) विभागाने “Access Control on Western Express Highway (from Mahim to Dahisar), Mumbai” व्यवहार्यता (Feasibility) व विस्तृत प्रकल्पाच्या (Detail Project Report) या कामांकरीता जागतिक सल्लागारांकडून निविदा मागविण्यात आल्या व माहे सप्टेंबर २०१९ मध्ये M/s. Louis Berger Consulting Private Limited (US based) यांची नियुक्ती करण्यात आली. M/s. Louis Berger Consulting Private Limited यांनी विविध पर्यायांचा अभ्यास करून अंतिमत: पश्चिम द्रुतगती मार्गावरील Domestic and International Airport येथे नियंत्रित प्रवेश मार्ग (Access Control) करीता उन्नत (Flyover) / भुयारी वाहन मार्ग (Underpass) प्राधिकरणाच्या (T&C) विभागाच्या मान्यतेने अंतिम करण्यात आले.

१६.२ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ डोमॅस्टीक टर्मिनल (T१) जवळ पश्चिम द्रुतगती महामार्गावर भुयारी मार्गाचे बांधकाम करणे आणि कि.मी. ५ + ३०० ते कि.मी. ६ + १०० मधील उड्डाणपुलाचे रुंदीकरणाचे बांधकाम करून सुधारीकरण करणे.

टप्पा — १ च्या प्रकल्पाचे स्वरूप :

वांद्रे मुंबईकडून छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय विमानतळाकडे जाण्याकरीता (-1 level) खाली ०.३८४ किमी. व १०.२५ मी. रुंदीचा २ लेन ड्रेनसह नियंत्रित भुयारी प्रवेश मार्ग. तसेच दहिसरकडून मुंबई वांद्रेकडे येण्याकरीता ०.४५८ किमी. व ३.५ मी. रुंदीचा १ लेन उन्नत मार्ग अस्तित्वातील उन्नत मार्गाशी समकक्ष व वांद्रे मुंबईकडून दहिसरकडे जाण्याकरीता ०.२३९ किमी. व ३.५ मी. रुंदीचा १ लेन उन्नत मार्ग अस्तित्वातील उन्नत मार्गाशी समकक्ष ड्रेनसह प्रस्तावित केलेला आहे.

प्रकल्पाचे फायदे :

वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी वांद्रेवरून आंतरराज्यीय विमानतळावर जाण्याकरीता (-१ level) या भुयारी मार्गामुळे फ्री राईट टर्न उपलब्ध होईल, सिग्नल टाईमिंग कमी होईल व वाहतुक सुरळीत होईल. सद्याच्या जुहू - विले पार्ले उन्नत मार्गाला १ लेन दहिसरकडे जाण्याकरीता व १ लेन वांद्रेकडे जाण्याकरीता अधिक प्रस्तावित करत आहोत. ज्यामुळे उन्नत मार्गाच्या रहदारीची क्षमता वाढेल.

पश्चिम द्रुतगती महामार्गावरील समस्यांवर मात करुन सुरक्षिततेसह भुयारी मार्गाने ४० कि.मी. प्रती तास वेगाने प्रवास करता येईल व होणारा विलंब व प्रदूषण कमी होईल तसेच प्रवाशांचा प्रवास आरामदायक, सुखद व वेळेत होईल.

१६.३ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (T२) टर्मिनल जवळ पश्चिम द्रुतगती महामार्गावर कि.मी. ६ + १४० ते कि.मी. ६ + ९५० येथे भुयारी मार्गाचे बांधकाम करून सुधारीकरण करणे.

टप्पा — २ च्या प्रकल्पाचे स्वरूप :

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून दहिसरकडे जाण्याकरीता (-2 level) खाली १.०३५ किमी. व १०.२५ मी. रुंदीचा २ लेन ड्रेनसह नियंत्रित भुयारी प्रवेश मार्ग तसेच (-1 level) वांद्रे मुंबईच्या दिशेने जाण्याकरीता ०.५०५ किमी. व १०.२५ मी. रुंदीचा २ लेन ड्रेनसह नियंत्रित भुयारी प्रवेश मार्ग प्रस्तावित केलेला आहे.

प्रकल्पाचे फायदे :

सद्य:स्थिती आंतरराष्ट्रीय विमानतळाकडून दहिसरकडे जाण्यासाठी फ्री लेफ्ट घेवून आंतरराज्यीय विमानतळाच्या जंक्शनपर्यंत जावून यु टर्न घ्यावा लागतो, यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावर वाहतुक कोंडी होते. हि दुर करण्यासाठी (-२ level) ला

आंतरराष्ट्रीय विमानतळाकडून दहिसरला जाण्याकरीता भुयारी मार्ग प्रस्तावित केला आहे. तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळाकडून वांद्रेकडे जाण्यासाठी (-1 level) ला भुयारी मार्ग प्रस्तावित केला आहे. या दोंन्ही भुयारी मार्गांमुळे आंतरराष्ट्रीय विमानतळाकडून वांद्रेकडे व दहिसरकडे जाण्या-या पश्चिम द्रुतगती महामार्गावर जलद गतीने जाण्यासाठी उपयुक्त ठरेल तसेच वाहतुक कोंडी कमी होवून रहदारीची क्षमता वाढेल. पश्चिम द्रुतगती महामार्गावरील समस्यांवर मात करुन सुरक्षिततेसह भुयारी मार्गांनी ४० कि.मी. प्रती तास वेगाने प्रवास करता येईल व होणारा विलंब व प्रदूषण कमी होईल तसेच प्रवाशांचा प्रवास आरामदायक, सुखद व वेळेत होईल.

१६.४ तपशीलवार अंदाजपत्रक :

सदरहु दोंन्ही कामांकरीता M/s. Louis Berger Consulting Private Limited यांनी विस्तृत प्रकल्प अहवाल (Detail Project Report) प्राधिकरणाला सादर केल्यानंतर टप्पा -१ करीता रु.७६.०६ कोटीचे तपशीलवार अंदाजपत्रक (Detailed Estimate) तयार करण्यात आले. व टप्पा -२ करीता रु.१५१.९२ कोटीचे तपशीलवार अंदाजपत्रक (Detailed Estimate) तयार करण्यात आले.

M/s. Louis Berger Consulting Private Limited यांनी वरील दोन्ही नियंत्रित भुयारी प्रवेश मार्ग व उन्नत मार्ग या कामांकरीता तपशीलवार अंदाजपत्रक (Detailed Estimate) तयार करण्यात आलेले असून सदरहू कामाकरीता दोन्ही मिळून रु.२२७.९७ कोटीचे तपशिलवार अंदाजपत्रक (Detailed Estimate) तयार करण्यात आले.

१६.५ तत्वता अंदाजपत्रकास मान्यता :

वरील दोन्ही नियंत्रित भुयारी प्रवेश मार्ग व उन्नत मार्ग या कामांकरीता (१. रु.७६.०६ कोटी व २. रु.१५१.९२ कोटी) रु.२२७.९७ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर दोन्ही कामांच्या मुळ किमतीमध्ये ४% आकस्मित खर्च (Contingencies), दरवाढ १०%, प्रस्तावित सेवावहिन्या स्थलांतर, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फी, देखभाल खर्च इ. समाविष्ठ करण्यात आलेले आहे. वरील गोषवा-यातील नमुद शाखानिहाय अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेवून कामाच्या व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुकीबाबतच्या निविदा मागविणे इ. कामे हाती घेण्याबाबत मंजुरी मिळणेस्तव कार्यालयीन टिप्पणीद्वारे विनंती करण्यात आलेली होती.

महानगर आयुक्त यांच्या दि.२३/११/२०२० रोजीच्या उपरोक्त कार्यालयीन टिप्पणीस मा. मंत्री, नगर विकास महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांची दि.०७/१२/२०२० रोजी मान्यता प्राधिकरणाच्या बैठकीच्या मान्यतेच्या अधिन राहून प्रदान झालेली आहे.

सदरहु दोन्ही कामास तांत्रिक मान्यता प्राप्तीअंती कामाच्या निविदा दि. २१/१२/२०२० रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येऊन काम निविदा स्तरावर आहे. सदर कामावर देखरेख करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

१६.६ पश्चिम द्रुतगती मार्गावरील Domestic and International Airport वरील दोन्ही नियंत्रित प्रवेश मार्ग (Access Control) करीता उन्नत (Flyover) / भुयारी मार्गांच्या (Vehicular Underpass) या कामांकरीता (१. रु.७६.०६ कोटी व २. रु.१५१.९२ कोटी) रु.२२७.९७ कोटीच्या कामास मा. मंत्री, नगर विकास महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी दि.०७/१२/२०२० रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तरी सदरहू प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली.

१६.७ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१५६०:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकाराचा वापर करून प्राधिकरण याद्वारे पश्चिम द्रुतगती मार्गावरील Domestic and International Airport वरील दोन्ही नियंत्रित प्रवेश मार्ग (Access Control) करीता उन्नत (Flyover) / भुयारी मार्गांच्या (Vehicular Underpass) या कामांकरीता (१. रु.७६.०६ कोटी व २. रु.१५१.९२ कोटी) रु.२२७.९७ कोटीच्या अंदाजित खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**<u>बाब क्र.१७</u> : <u>शासन निदेशानुसार अंबरनाथ, कुळगांव-बदलापुर आणि परिसर अधिसुचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेमधील मौ. कांबा, ता. कल्याण येथील स.नं.९, १०, ११, १२, १३, ३१ व ३३ या जमिनी हरित परिमंडळामधून वगळून शैक्षणिक वापर (Educational Purpose) या वापर विभागात समाविष्ट करणेसंदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाच्या कार्यवाही विषयी प्राधिकरणास अवगत करणेबाबत.</u>**

१७.१ महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास योजनेमधील मौ. कांबा, ता. कल्याण येथील स. नं. ९, १०, ११, १२, १३, ३१ व ३३ या जमिनी हरित परिमंडळामधून वगळून "शैक्षणिक वापर" (Educational Purpose) या वापर विभागात समाविष्ट करणेसंदर्भात शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०२० रोजीच्या निदेशान्वये फेरबदलाबाबतची सूचना ९० दिवसांच्या आत महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वयेची कार्यवाही करावयाचे निदेश दिले असल्याचे सांगितले.

१७.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर जागेवर BITS पिलानी या राष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक संस्थेच्या उभारणीमुळे मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासास चालना मिळणार आहे.

१७.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, शासन निदेशात नमूद केलेला नोटीस प्रसिद्धीकरणाचा कालावधी दिनांक १६ डिसेंबर, २०२० रोजी समाप्त होत असल्याने व या दरम्यान प्राधिकरणाची बैठक प्रस्तावित नसल्याने सदर फेरबदलाबाबत उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन त्यानुसार शासनास अहवाल पाठविण्यात येणार आहे.

१७.४ चर्चेनंतर, प्राधिकरणाने सदर बाबीची नोंद घेतली व पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१५६१:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उप कलम १ चे पोट कलम (क) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून

प्राधिकरण याद्वारे अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास योजनेमधील मौ. कांबा, ता. कल्याण येथील स. नं. ९, १०, ११, १२, १३, ३१ व ३३ या जमिनी हरित परिमंडळामधून वगळून शैक्षणिक वापर (Educational Purpose) या वापर विभागात समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये जमीन वापर फेरबदल करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे वरीलप्रमाणे विकास योजनेमध्ये फेरबदल करण्यासंदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ मधील यापुढील सर्व आवश्यक वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.१८ : वडाळा भारवाहक तळ येथील भूखंड क्र. ब्लॉक-सी च्या भाडेपट्ट्याच्या देय अधिमूल्याच्या रक्कमेवर दिनांक २६ डिसेंबर, २०१७ पूर्वी व्याज न आकारणे व ७०,००० चौ.मी. बांधकाम क्षेत्र परत घेण्यासंदर्भात मे.मॅक्रोटेक डेव्हलपर्स लिमिटेड यांनी केलेल्या विनंतीबाबत.**

१८.१ मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदर विषयावर विचार विमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**पटल बाब क्र.०१ : प्राधिकरणातील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांना "कर्मचारी कुटुंब सुरक्षा योजना" सुरू करणेबाबत.**

उपरोक्त प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना "कर्मचारी कुटुंब सुरक्षा योजना" लागू करण्याबाबत प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी संघटना १९९८ पासून विनंती करीत आहेत. त्यांनी पुढे असेही निदर्शनास आणले की, शासनामध्ये निवृत्तीवेतन योजना सुरु होती, ती सन २००५ नंतर बंद करण्यात आली, शासनाने दिनांक ०१.११.२००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना "राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना" अंमलात आणली आहे व दिनांक ०१.११.२००५ पूर्वी कार्यरत असलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पूर्वीची निवृत्ती वेतन योजना कार्यान्वीत आहे. प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे जीवन सुलभ व्हावे म्हणून दिनांक ०१.११.२००५ पूर्वीच्या प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाचा लाभ द्यावा व त्यादृष्टीने "कर्मचारी कुटुंब सुरक्षा योजना" लागू करावी अशी मागणी सदर संघटनांनी पुन्हा केली आहे.

मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (सेवा व शर्ती) विनियम, १९७७ प्रमाणे प्राधिकरण जोपर्यंत आवश्यक सेवाविषयक स्वत:चे नियम तयार करीत नाही, तोपर्यंत भविष्य निर्वाह निधी व निवृत्तीवेतन योजना वगळून इतर सर्व सेवाविषयक नियम म्हणजे वार्षिक वेतन भत्ते, रजा, इत्यादी सर्व नियम महाराष्ट्र नागरी सेवा नियमाप्रमाणे म्हणजेच शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना जसेच्या तसे लागू करण्यात आलेले आहेत. प्राधिकरणाच्या दिनांक १३.१२.१९७९ रोजी झालेल्या २० व्या बैठकीमध्ये ठराव क्र. १६८ अन्वये पहिल्यांदा प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्यासंबंधी प्रस्तावावर चर्चा झाली होती व याबाबत तत्कालीन महानगर आयुक्तांनी सदर बाबीचा सखोल अभ्यास करून निवृत्तीवेतन योजनेसंबंधीचा प्रस्ताव तपासून प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येईल. असे निवेदन केले.

त्यानंतर संघटनेच्या विनंती अर्जास अनुसरुन दि.१६.०५.१९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ९३ व्या बैठकीमध्ये अंशदायी भविष्य निर्वाह निधी ऐवजी शासकीय कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना सुरु करावी असा प्रस्ताव दुस-यांदा सादर करण्यात आला होता. शासनाने त्यावेळी अवलंबिलेल्या धोरणानुसार आणि दिनांक २२ ऑक्टोबर, १९८६ च्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या यादीत नाव असलेल्या महामंडळानी आर्थिक बाबी विषयक निर्णय घेताना शासनाची मंजूरी घ्यावी असे बंधन त्याव्दारे घातले असल्याने प्राधिकरणाने निवृत्तीवेतन योजना लागू करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सन १९९८ मध्ये राज्यातील सार्वजनिक उपक्रम यादीतील महामंडळांना तसेच इतर महामंडळांना निवृत्तीवेतन योजना लागू करता येणार नाही असा धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने घेतल्यामुळे प्राधिकरणाच्या निवृत्तीवेतन योजनेच्या प्रस्तावास मान्यता मिळू शकली नाही.

महाराष्ट्र शासन, वित्त विभागाच्या दिनांक २८.०७.२००३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे प्राधिकरणाचे नाव सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या यादीतून वगळण्यात आले आहे. त्यामुळे वित्त विभागाच्या दि.१०.०९.२००१ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेला उच्चस्तरीय सचिव समितीच्या पदांसंदर्भातील बाबींच्या कार्यपध्दतीतून प्राधिकरणास वित्त विभागाच्या दि.०४ फेब्रुवारी, २००४ रोजीच्या शासन निर्णयानूसार वगळण्यात आलेले आहे. त्यानुसार प्राधिकरणाला आर्थिक बाबी बाबत निर्णय घेताना

शासनाची पूर्व मंजूरी लागत नाही. प्राधिकरणात वेगवेगळया पदांची निर्मिती करणे, सेवाविषयक बाबी ठरविणे याबाबतचा अधिकार मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ कलम ११ (२) अन्वये प्राधिकरणास आहेत. तसेच कलम ५० अन्वये नियम/विनियम तयार करण्याचे अधिकारही प्राधिकरणास आहेत. त्यामुळे प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना "कर्मचारी कुटुंब सुरक्षा योजना" लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्याची आवश्यकता नाही.

वरील परिच्छेदात नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन पुन्हा दि.२८ सप्टेंबर, २००६ रोजी झालेल्या ११७ व्या बैठकीत पटल बाब म्हणून तिस-यांदा निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यावेळी महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून, त्या प्रस्तावानुसार प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना निवृत्ती योजनेचे फायदे देता येतील का? याबाबत महानगर आयुक्तांनी तपासणी करुन त्या अनुषंगाने शासनास अहवाल पाठवावा असा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

परंतु, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाचे नाव सार्वजनिक उपक्रम यादीमध्ये असल्यामुळे व सदर मंडळ शासनाच्या अनुदानावर अवलंबून असल्यामुळे, शासनाच्या १९९२ च्या धोरणात्मक निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या निवृत्तीवेतन योजनेनुसार प्रस्तावाला शासनाची मान्यता मिळाली नाही व त्यामुळे प्राधिकरणाचाही प्रस्ताव प्रलंबित राहीला.

महानगर आयुक्तांनी प्रस्तावित केले की, प्राधिकरणातील दिनांक ०१.११.२००५ पूर्वी नियुक्त असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या सुमारे १२१ अधिकारी / कर्मचारी अथवा त्यांचे कुटुंब ज्यामध्ये अधिकारी / कर्मचारी ज्यांची कायमस्वरूपी सेवा २० वर्षे प्राधिकरणात झाली आहे त्यांच्याकरीता शासनाच्या निवृत्ती वेतन योजनेच्या धर्तीवर "कर्मचारी कुटुंब सुरक्षा योजना" राबवावी तसेच प्राधिकरणामध्ये दिनांक ०१.११.२००५ नंतर नियुक्त झालेल्या व होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" (Defined Contribution Pension Scheme) राबविण्याबाबत मान्यता प्रदान करण्याची विनंती केली. तसेच सदर दोन्ही योजनांची नियमावली, सदरच्या निधीचे व्यवस्थापन, भविष्य निर्वाह निधीमधून प्राधिकरणाचे अंशदान सदर योजनेच्या निधीकडे वर्ग करण्याबाबतची व्यवहार्यता तपासून त्यावर ठोस प्रस्ताव सादर करणे, प्रत्यक्षात करावी लागणारी आर्थिक तरतुद, पात्रता,

इतर अटी व शर्ती इत्यादी बाबींसह सविस्तर प्रस्ताव बनविण्यासाठी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्याची विनंती केली, तसेच सदरचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येईल, असेही नमूद केले. सबब दिनांक ०१.११.२००५ पूर्वी नियुक्त करण्यात आलेल्या व ज्यांची सेवा २० वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्या कुटूंबीयांना शासनाच्या निवृत्ती वेतन योजनेच्या धर्तीवर "कर्मचारी कुटुंब सुरक्षा योजना" लागू करण्यास तत्वत: मान्यता देण्याची व दिनांक ०१.११.२००५ नंतरच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासनाच्या योजनेप्रमाणे "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" लागू करण्यास प्राधिकरणाची तत्वत: मान्यता देण्याची विनंती केली.

सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर करण्यात आला :-

**ठराव क्र.१५६२:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ११(२) अन्वये तसेच त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, प्राधिकरणातील दिनांक ०१.११.२००५ पूर्वी नियुक्त झालेल्या कायमस्वरुपी २० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या आणि आज रोजी कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्या कुटुंबियांना शासनाच्या निवृत्ती वेतन योजनेच्या धर्तीवर "कर्मचारी कुटुंब सुरक्षा योजना" तसेच दिनांक ०१.११.२००५ नंतर नियुक्त झालेल्या व होणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" (Defined Contribution Pension Scheme) च्या धर्तीवर निवृत्ती लाभ देण्यास तत्त्वत: मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रस्तावित "कर्मचारी कुटुंब सुरक्षा योजने" च्या सदर दोन्ही योजनांची नियमावली, निधीचे व्यवस्थापन, प्राधिकरणास प्रत्यक्षात करावी लागणारी आर्थिक तरतुद, पात्रता, इतर अटी व शर्ती, भविष्य निर्वाह निधीमधून प्राधिकरणाचे अंशदान सदर योजनेच्या निधीकडे वर्ग करण्याबाबतची व्यवहार्यता तपासून त्यावर ठोस प्रस्ताव सादर करणे. इत्यादी बाबींसह सविस्तर प्रस्ताव बनविण्यासाठी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे. तसेच या योजनेबाबतचा सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सादर करण्यासही निर्देश देत आहे.

**“आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**मानसीय अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा केलेले विषय :**

मा. मंत्री, नगर विकास तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांनी राष्ट्रीय महामार्ग क्र.४ ते खोणी तळोजा रस्त्याला जोडणाऱ्या लिंक रोडच्या कामाबाबत लक्षवेध केला. श्री. जितेंद्र आव्हाड, मा.मंत्री, गृहनिर्माण यांनी कळवा नाका येथील काम सुरू असलेल्या उड्डाणपूलाचे रेल्वे मार्गापलिकडे विस्तारीकरण करणे, कळवा नाका ते आत्माराम पाटील चौक, खारेगांव रस्त्याचे बांधकाम करणे व मुंब्रा शहरातून जाणाऱ्या रस्त्यावर उन्नत मार्गाचे बांधकाम करणे या कामाबाबत विचारणा केली. या प्रस्तावांबाबत पडताळणी करण्यात येईल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

मा. मंत्री, नगर विकास तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांनी ठाणे महानगर पालिकेने प्राधिकरणाकडे ठाणे कोस्टल रोडचा (ठाणे घोडबंद बायपास रस्ता) सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला आहे. सदर प्रकल्पाचे बांधकाम प्राधिकरणामार्फत कार्यान्वित करण्यात यावे असे निर्देश दिले.

त्यानंतर, माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********